निपक्ष व निर्भिड वृत्तपत्र

# आत्ताच एक्सप्रेस

छत्रपती संभाजीनगर
गुरुवार
१५ जानेवारी २०२६
पाने: ०४ किंमत: २ .००
वर्ष: १५ वे अंक: ३२१ वा

RNI.No.MAH/MAR2011/39247

E-mail:dainikattachexpress@gmail.com | E-Paper : http://attachexpress.in | Post Regd.No. G 2/RNP/AGD-441/2024-26 | मुख्य संपादक- सुग्रीव मुंढे

# महाराष्ट्र निवडणूक बिगुल: १२ जिल्हा परिषदा आणि १२५ पंचायत समित्यांचा निवडणूक कार्यक्रम जाहीर

## ५ फेब्रुवारीला मतदान; ७ फेब्रुवारीला मतमोजणी - राज्य निवडणूक आयुक्त

**आत्ताच एक्सप्रेस**

**मुंबई/ प्रतिनिधी/** राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची प्रतीक्षा अखेर संपली आहे. राज्य निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे यांनी आज सह्याद्री अतिथीगृह येथे आयोजित पत्रकार परिषदेत राज्यातील १२ जिल्हा परिषदा आणि त्यांतर्गतच्या १२५ पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणुकांचा अधिकृत कार्यक्रम जाहीर केला. या घोषणेसोबतच संबंधित निवडणूक क्षेत्रांमध्ये आचारसंहिता लागू झाली आहे.

निवडणुकीचे वेळापत्रक आणि महत्त्वाचे टप्पे

राज्यातील या महत्त्वाच्या मिनी विधानसभा मानल्या जाणाऱ्या निवडणुकांसाठी ५ फेब्रुवारी २०२६ रोजी मतदान पार पडणार असून, ७ फेब्रुवारी २०२६ रोजी मतमोजणी होऊन निकाल स्पष्ट होतील. निवडणुकीची अधिकृत सूचना १६ जानेवारी २०२६ रोजी जिल्हाधिकाऱ्यांमार्फत प्रसिद्ध केली जाईल.

**निवडणूक कार्यक्रमाचे मुख्य टप्पे:**

निवडणूक सूचना प्रसिद्धी: १६ जानेवारी २०२६

नामनिर्देशनपत्रे स्वीकारणे: १६ ते २१ जानेवारी २०२६

छाननी: २२ जानेवारी २०२६

अर्ज माघारीची मुदत: २७ जानेवारी २०२६ (दुपारी ३ वाजेपर्यंत)

चिन्ह वाटप व अंतिम उमेदवारांची यादी: २७ जानेवारी २०२६

मतदान: ५ फेब्रुवारी २०२६ (सकाळी ७.३० ते सायंकाळी ५.३०)

मतमोजणी: ७ फेब्रुवारी २०२६

**निवडणूक होणाऱ्या जिल्ह्यांची यादी**




या टप्प्यात प्रामुख्याने पश्चिम महाराष्ट्र, कोकण आणि मराठवाड्यातील जिल्ह्यांचा समावेश आहे. यात रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, पुणे, सातारा, सांगली, सोलापूर, कोल्हापूर, छत्रपती संभाजीनगर, परभणी, धाराशिव आणि लातूर या १२ जिल्हा परिषदांचा समावेश आहे.

या १२ जिल्ह्यांमध्ये जिल्हा परिषदेच्या एकूण ७३१ जागांसाठी, तर १२५ पंचायत समित्यांच्या १,४६२ जागांसाठी मतदान होणार आहे. महिलांसाठी जिल्हा परिषदेत ३६९ आणि पंचायत समित्यांमध्ये ७३१ जागा राखीव ठेवण्यात आल्या आहेत.

**आचारसंहिता आणि नियम**

निवडणूक जाहीर झाल्यापासून संबंधित क्षेत्रांत आदर्श आचारसंहिता लागू झाली आहे. आयोगाने स्पष्ट केले आहे की, जरी आचारसंहिता विशिष्ट क्षेत्रापुरती असली, तरी इतर ठिकाणी अशा कोणत्याही घोषणा करता येणार नाहीत ज्याचा प्रभाव या निवडणुकीतील मतदारांवर पडू शकेल. मात्र, नैसर्गिक आपत्तीच्या काळात मदत कार्य करण्यास आचारसंहितेची कोणतीही आडकाठी नसेल.

**मतदारांसाठी महत्त्वाची माहिती**

जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुका एकाच वेळी होत असल्याने, प्रत्येक मतदाराला दोन मते द्यावी लागतील.

१. पहिले मत: जिल्हा परिषद उमेदवारासाठी.

२. दुसरे मत: पंचायत समिती उमेदवारासाठी.

मतदारांच्या सोयीसाठी आयोगाने 'मताधिकार' नावाचे मोबाईल प उपलब्ध करून दिले आहे. गुगल प्ले स्टोअरवरून हे प डाऊनलोड करून मतदार आपले नाव, मतदान केंद्र आणि उमेदवारांची माहिती मिळवू शकतात. याशिवाय आयोगाच्या अधिकृत संकेतस्थळावरही ही माहिती उपलब्ध असेल. १ जुलै २०२५ रोजीची अद्ययावत मतदार यादी या निवडणुकीसाठी आधार मानली गेली आहे.

**उमेदवारांसाठी महत्त्वाच्या तरतुदी**

१. ऑफलाईन अर्ज प्रक्रिया: तांत्रिक अडचणी आणि राजकीय पक्षांची मागणी लक्षात घेता, यावेळी नामनिर्देशनपत्रे (अर्ज) पारंपरिक ऑफलाईन पद्धतीने स्वीकारली जाणार आहेत.

२. जातवैधता प्रमाणपत्र: राखीव जागांवर निवडणूक लढवणाऱ्या उमेदवारांना जात पडताळणी प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. जर प्रमाणपत्र उपलब्ध नसेल, तर समितीकडे केलेल्या अर्जाची पोचपावती सादर करावी लागेल. निवडून आल्यास ६ महिन्यांच्या आत प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक आहे, अन्यथा निवड रद्द होऊ शकते.

३. खर्च मर्यादा: निवडणूक खर्चावर आयोगाने कडक मर्यादा घातली आहे. जिल्हा परिषदेच्या जागांच्या संख्येनुसार खर्च मर्यादा ६ लाख ते ९ लाख रुपयांपर्यंत आहे, तर पंचायत समितीसाठी ४.५० लाख ते ६ लाख रुपयांपर्यंत मर्यादा निश्चित करण्यात आली आहे.

**प्रशासकीय तयारी आणि सुविधा**

निवडणुकीसाठी साधारण १ लाख २८ हजार कर्मचारी तैनात करण्यात आले आहेत. सुमारे २५,४८२ मतदान केंद्रांवर ईव्हीएम यंत्राद्वारे मतदान होईल.

ईव्हीएम: १,१०,३२९ बॅलेट युनिट आणि ५१,५३७ कंट्रोल युनिटची व्यवस्था करण्यात आली आहे.

विशेष सुविधा: ज्येष्ठ नागरिक, दिव्यांग आणि गरोदर महिलांना मतदानासाठी प्राधान्य दिले जाईल. ज्या केंद्रांवर महिलांची संख्या अधिक आहे, तिथे पूर्णपणे महिला कर्मचाऱ्यांचे 'पिंक मतदान केंद्र' उभारले जाणार आहे. प्रसारमाध्यम संनियंत्रण: पेड न्यूज आणि सोशल मीडियावरील जाहिरातींवर लक्ष ठेवण्यासाठी जिल्हाधिकारी स्तरावर 'माध्यम प्रमाणन व संनियंत्रण समिती' (MCMC) स्थापन करण्यात आली आहे.

जाहीर प्रचाराची सांगता

निवडणूक नियमांनुसार, ५ फेब्रुवारीच्या मतदानापूर्वी २४ तास आधी म्हणजेच ३ फेब्रुवारी २०२६ रोजी रात्री १२ वाजता जाहीर प्रचार संपुष्टात येईल. त्यानंतर कोणत्याही माध्यमाद्वारे (सोशल मीडिया, टीव्ही, वृत्तपत्र) जाहिरात प्रसारित करण्यास बंदी असेल.

---

## संक्षिप्त

### ओळखपत्र नसेल तर 'ही' १२ ओळखपत्र मतदानाला चालणार का? जाणून घ्या

**आत्ताच एक्सप्रेस**

**मुंबई/ प्रतिनिधी/** राज्यभरात १५ जानेवारी रोजी महानगरपालिकेचे मतदान पार पडणार आहेत. या निवडणुकीबाबत संपूर्ण महाराष्ट्रात उत्सुकता आहे. निवडणुका म्हटल्या तर मतदार हा अतिशय महत्त्वाचा घटक असतो. मतदारांनी दिलेल्या मतांवर नेते निवडून येतात. निवडणुका जाहीर झाल्या की मतदार यादी देखील जाहीर होते, यासोबतच ही मतदार यादी प्रत्येक वेळी बदलत असते. काही वेळा बऱ्याच जणांची नावं मतदार यादीतून गहाळ होतात, त्यामुळे मतदार यादीत तुमच नाव आहे का? तसेच, मतदान ओळखपत्र नसेल तर कसं मतदान करायचं? त्यासाठी इतर कोणते ओळखपत्र असावेत? हे तुम्ही घरबसल्या देखील अगदी सोप्या ऑनलाईन पद्धतीने तपासून घेऊ शकता. यामुळे ऐनवेळी तुमचा गोंधळ होणार नाही.

**मतदार यादीत तुमचं नाव कसं शोधाल?**

१. मतदारांना मतदार यादीतील आपलं नाव शोधता यावं, तसेच मतदान केंद्र शोधता यावं यासाठी निवडणूक आयोगाने विशेष संकेतस्थळ उपलब्ध करुन दिल आहे. त्यासाठी सर्वात आधी तुम्ही या लिंकवर क्लिक करा - voters.eci.gov.in आणि संकेतस्थळाला भेट द्या

२. voters.eci.gov.in वेबसाईटच्या वरच्या बाजूला तुम्हाला काही पर्याय दिसतील. तिथे नाव शोधण्यासाठी ३ पर्याय मिळतील: एझखउ (ओळखपत्र) नंबरद्वारे किंवा वैयक्तिक माहितीद्वारे मोबाईल नंबरद्वारे

३. यात 'डशरीलह लू ऊशींरळश्री' हा पर्याय निवडल्यास, तिथे तुमचे राज्य, भाषा, स्वतःचे पूर्ण नाव, वडिलांचे नाव, जन्म तारीख, वय, लिंग, जिल्हा आणि तुमचा विधानसभा मतदारसंघ ही माहिती अचूक भरा.

४ कॅप्चा कोड: सर्व माहिती भरल्यानंतर खाली दिलेला कॅप्चा कोड (Captcha) टाईप करा आणि 'Search' वर क्लिक करा.

५. माहिती तपासा: जर तुमचे नाव यादीत असेल, तर खाली तुमची माहिती दिसेल. त्यानंतर 'View Details' वर क्लिक करा.

६. मतदान केंद्राची माहिती: येथे तुम्हाला तुमचे नाव, मतदान केंद्र (Polling Station), भाग क्रमांक आणि अनुक्रमांक अशी सर्व महत्त्वाची माहिती पाहायला मिळेल.

७. स्लिप डाऊनलोड करा: सर्वात शेवटी 'Print Voter Information' या बटनावर क्लिक करून तुम्ही तुमच्या मतदान माहितीची पीडीएफ (PDF) डाऊनलोड करू शकता. ही प्रिंट तुम्हाला मतदानाच्या दिवशी ओळख म्हणून सोबत ठेवता येईल.

**मतदान ओळखपत्र नसल्यास 'ही' १२ ओळखपत्रे आवश्यक :** सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे, जर तुमच्याकडे मतदार ओळखपत्र नसेल तरीही तुम्ही निवडणुकीत मतदान करू शकता. यासाठी फक्त एक महत्त्वाची गोष्ट करणं गरजेचं आहे. ओळखपत्र नसलं तरी चालेल, पण अधिकृत मतदार यादीत तुमचं नाव असलं पाहिजे. जर तुमचं यादीत नाव असेल तर तुम्ही घरी येणाऱ्या निवडणूक स्लिपची (Voter Slip) प्रिंटआउट घेऊन जाऊन मतदान करू शकता. फक्त या निवडणूक स्लिपसोबत तुम्ही खालील पैकी एक कागदपत्र मतदान केंद्रावर घेऊन जाऊ शकता. निवडणूक आयोगाने विविध १२ प्रकारची ओळखपत्रे मतदानासाठी मंजूर केली आहेत. आधारकार्ड, मनरेगाचे जॉब कार्ड, बँकेचे किंवा टपाल कार्यालयाचे छायाचित्र असलेले पासबुक, आरोग्य विमा स्मार्ट कार्ड, ड्रायव्हिंग लायसन्स, पॅन कार्ड, राष्ट्रीय लोकसंख्या कार्ड, पारपत्र (पासपोर्ट), पेन्शन कार्ड, केंद्र किंवा राज्य सरकारचे ओळखपत्र, दिव्यांग कार्ड किंवा खासदार-आमदारांनी दिलेले ओळखपत्र यांचा समावेश आहे.

---

## कारमध्ये आढळली तब्बल २९ लाख रोकडसह ३ किलो सोने अन् ८ किलो चांदी

### पावत्या नसल्याने मुद्देमाल जप्त, जळगावात स्थिर सर्व्हेक्षण पथकाची कारवाई

**आत्ताच एक्सप्रेस**

**जळगाव / प्रतिनिधी/** महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर ममुराबाद नाका येथे स्थिर सर्व्हेक्षण पथकाने मोठी कारवाई केली आहे. यात एका कारची तपासणी केली असता तब्बल २९ लाख रुपये रोकड, ३ किलो चांदी व ८ तोळे सोने आढळून आले आहे. कारमधील तिघांनी हा मुद्देमाल बऱ्हाणपूरहून जळगाव येथील सराफा दुकानांसाठी नेल्याचे सांगितले, परंतु त्यांच्याकडे पावत्या नव्हत्या. परिणामी पोलिसांनी पंचनाम्यानंतर हा मुद्देमाल भरारी पथकाच्या ताब्यात घेतला असून, पावत्या सादर केल्यानंतर पुढील निर्णय घेतला जाणार आहे. मात्र ऐन निवडणुकीच्या काळात संशयास्पद रोकड आणि सोनेचांदी सापडून आल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. शिवाय आता पोलीस तपासाअंती सत्य कळू शकणार आहे. मात्र, निवडणुकीच्या धामधुमीत जळगाव पोलिसांचीही मोठी कारवाई असून पावत्या नसल्याने संशय बळावला आहे.



**जळगावमध्ये महिलांना पैसे वाटल्याचा व्हिडीओ व्हायरल :** राज्यात महापालिका निवडणुकांच्या प्रचाराची सांगता झाली आहे. आता प्रतीक्षा असणार आहे ती मतदान आणि त्यांनतरच्या निकालाची. मात्र असे असताना राज्यात काही ठिकाणी मतदारांना पैसे वाटप करण्यात येत असल्याच्या घटना घडताना दिसत आहे. जळगावमध्येही मतदारांना पैसे वाटप करण्यात येत असल्याचा आरोप करण्यात येत आहे. आपल्या उमेदवाराला मतदारांनी मतदान करावं, यासाठी जळगावमधील प्रभाग क्रमांक ११ मधील शिवसेना शिंदे गटाचे संतोष पाटील आणि ललित कोल्हे यांच्या वतीने मतदार महिलांना पैसे वाटप केला जात असल्याचा व्हिडिओ व्हायरल करत कैलास हटकर या अपक्ष उमेदवाराने राजकीय क्षेत्रात खळबळ उडवून दिली आहे. अशातच आता पुन्हा त्यांनी महिलांना डांबून ठेवल्याचा आरोप करत तसा व्हिडीओ देखील सोशल मिडियामध्ये व्हायरल केल्याने खळबळ उडाली आहे.

**महिलाना डांबून ठेवल्याचा आरोप व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल :** दरम्यान, जळगाव शहरातील प्रभाग क्रमांक ११ मधील शिवसेना शिंदे गटाचे उमेदवार संतोष मोतीराम पाटील आणि कारागृहात असलेल्या ललित कोल्हे यांच्यासाठी हे पैसे वाटले जात असल्याच्या आरोप केले होते. यानंतर महिलाना डांबून ठेवल्याचा आरोप देखील विरोधी उमेदवार कैलास हटकर यांनी केला आहे. तशा स्वरूपातील व्हिडिओ त्यांनी सोशल मीडियावर वायरल केल्याने मोठी खळबळ उडाली आहे.

---

## डोक्यावर अन् प्रायव्हेट पार्टवर मारहाण; माजी सरपंचाच्या मुलाला संपवलं

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर / प्रतिनिधी/** जिल्ह्यातील कन्नड तालुक्यात राजकीय आणि सामाजिकदृष्ट्या प्रतिष्ठित असलेल्या कुटुंबातील तरुण शेतकऱ्याची तथा माजी सरपंच यांच्या मुलाची हत्या झाल्याची घटना उघडकीस आली आहे. जामडी तांडा येथील माजी सरपंच यांच्या मुलाची हत्या करण्यात आली असून मृतदेह रक्ताच्या थारोळ्यात शेतालगतच्या वनविभागाच्या हद्दीत आढळून आला. या घटनेमुळे संपूर्ण तालुक्यात खळबळ उडाली असून गावात तणावाचं वातावरण निर्माण झालं आहे.



माजी सरपंच रामचंद्र पवार यांचे सुपुत्र राजू रामचंद्र पवार (वय ४५) असं हत्या झालेल्या व्यक्तीचं नाव आहे. दरम्यान, याप्रकरणी मिळालेल्या माहितीनुसार, राजू पवार हे नेहमीप्रमाणे काल मंगळवारी सकाळी ८ वाजेच्या सुमारास आपल्या शेतात फेरफटका मारण्यासाठी घराबाहेर पडले होते. नियमित ९ वाजेपर्यंत ते घरी परततात, मात्र बराच वेळ होऊनही ते न परतल्याने आणि त्यांचा फोन लागत नसल्याने कुटुंबीयांची चिंता वाढली. त्यांनी ग्रामस्थांच्या मदतीने शोधमोहीम हाती घेतली. साडेचार तासांच्या अथक परिश्रमानंतर, शेतापासून ५०० मीटर अंतरावर असलेल्या वनविभागाच्या गट क्र. ९५ मधील ओढ्यात राजू पवार यांचा मृतदेह आढळून आला.

---

## प्री, पोस्ट-मॅट्रिक शिष्यवृत्तीसाठी ऑनलाईन अर्ज करण्याचे आवाहन

**आत्ताच एक्सप्रेस**

**मुंबई/ प्रतिनिधी/** प्री-मॅट्रिक (इ. ९ वी व १० वी) व पोस्ट-मॅट्रिक (इ. ११ वी ते पदव्युत्तर / व्यावसायिक अभ्यासक्रम) शिष्यवृत्तीच्या लाभासाठी मुंबई शहर जिल्ह्यातील विजाभज, इमाव व विमाप्र प्रवर्गातील विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज एनएसपी (नॅशनल स्कॉलरशिप पोर्टलवर) दिनांक ३१ जानेवारी २०२६ पर्यंत सादर करावेत, असे इतर मागास बहुजन कल्याण कार्यालय, मुंबई शहरचे सहाय्यक संचालक रविकिरण पाटील यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे कळविले आहे.

सामाजिक न्याय व अधिकारिता मंत्रालय, भारत सरकार यांच्यावतीने विजाभज, इमाव व विमाप्र प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी राष्ट्रीय शिष्यवृत्ती योजनेअंतर्गत, महाराष्ट्र राज्य मागासवर्ग आयोग व शिष्यवृत्ती विभाग, महाराष्ट्र राज्य यांच्या माध्यमातून शिष्यवृत्ती योजना राबविण्यात येत आहे. भारत सरकारकडून पीएम-वायएएसएएसव्हीआय (यंग आचीव्हर्स स्कॉलरशिप वार्ड स्कीम फॉर व्हायब्रेट इंडिया) या योजनेअंतर्गत आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील पात्र विद्यार्थ्यांसाठी प्री-मॅट्रिक (इ. ९ वी व १० वी) व पोस्ट-मॅट्रिक (इ. ११ वी ते पदव्युत्तर / व्यावसायिक अभ्यासक्रम) शिष्यवृत्ती देण्यात येत आहे.

प्री-मॅट्रिक शिष्यवृत्ती (इ. ९ वी व १० वी) अंतर्गत अटी: लागू प्रवर्ग : ओबीसी, व्हीजेएनटी, डीएनटी, एसबीसी शाळा शासकीय मान्य असणे आवश्यक, वार्षिक उत्पन्न मर्यादा रुपये २,५०,०००/-, किमान उपस्थिती ७५ टक्के, शिष्यवृत्ती रक्कम रुपये ५०००/- वार्षिक दोन मुलांपर्यंत लाभ (मुलींना मर्यादा नाही)

पोस्ट-मॅट्रिक शिष्यवृत्ती अंतर्गत अटी: लागू प्रवर्ग : ओबीसी, व्हीजेएनटी, डीएनटी, एसबीसी, वार्षिक उत्पन्न मर्यादा रुपये २,५०,०००/- , किमान उपस्थिती ७५ टक्के, एफआरए/मान्य प्राधिकरणांतर्गत अभ्यासक्रमांसाठीच शिष्यवृत्ती रक्कम डीबीटी द्वारे थेट विद्यार्थ्यांच्या आधार-लिंक बँक खात्यात, अभ्यासक्रम मध्येच सोडल्यास शिष्यवृत्ती रक्कम परत करावी लागेल

अर्ज प्रक्रिया: विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज https://scholarship.gov.in या संकेतस्थळावर सादर करावा.

अर्जासोबत जात प्रमाणपत्र, जातवैधता (लागू असल्यास), उत्पन्न प्रमाणपत्र, आधार-लिंक बँक खाते, बोनाफाईड प्रमाणपत्र, मागील वर्षाचे गुणपत्रक, आधार प्रमाणीकरणासह ७५ टक्के उपस्थितीचा पुरावा इत्यादी कागदपत्रे आवश्यक आहेत.

मुंबई शहर जिल्ह्यातील सर्व शाळा व महाविद्यालयातील प्राचार्य, शिक्षक व कर्मचारी यांनी विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती अर्ज प्रक्रियेत आवश्यक मार्गदर्शन करावे. तसेच सर्व पात्र विद्यार्थी या योजनेपासून वंचित राहू नयेत, असे आवाहनही इतर मागास बहुजन कल्याण कार्यालय, मुंबई शहर सहाय्यक संचालक रविकिरण पाटील यांनी केले आहे.

---

## पाचवी आणि आठवीच्या शिष्यवृत्ती परीक्षांचे प्रवेशपत्र उपलब्ध

**आत्ताच एक्सप्रेस**

**मुंबई/ प्रतिनिधी/** पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा (इ. पाचवी) व पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा (इ. आठवी) २२ फेब्रुवारी २०२६ रोजी राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये एकाच दिवशी घेण्यात येणार आहे.

या परीक्षेचे प्रवेशपत्र मंगळवार १३ जानेवारी २०२६ रोजी संबंधित शाळेच्या लॉगीनमध्ये उपलब्ध करून देण्यात आलेले आहेत. मुख्याध्यापकांनी प्रवेशपत्राची प्रिंट काढून तात्काळ सर्व परीक्षार्थ्यांना वितरित करावी. तसेच सर्व परीक्षार्थी आणि पालक यांनी मुख्याध्यापकांकडून प्रवेशपत्र प्राप्त करून घ्यावे, असे आवाहन महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या आयुक्त अनुराधा ओक यांनी केले आहे.

# तिळसंक्रांत: तिळगूळ, वाण आणि पतंग माणुसकीचा सण

भारतीय सणपरंपरेत काही सण हे केवळ धार्मिक विधीपुरते मर्यादित न राहता सामाजिक संवाद, नातेसंबंध आणि जीवनमूल्यांची आठवण करून देणारे असतात. मकरसंक्रांत हा असाच एक सण. ऋतूंच्या बदलाची, सूर्याच्या उत्तरायण प्रवासाची आणि माणसाच्या अंतर्मनात सकारात्मक ऊर्जेच्या प्रवेशाची ही सुरुवात असते. महाराष्ट्रात हा सण प्रामुख्याने 'तिळसंक्रांत' म्हणून ओळखला जातो. 'तिळगूळ घ्या, गोड गोड बोला' या साध्या वाक्यातून जीवनाचं मोठं तत्त्वज्ञान सांगणारा हा सण आजही सामाजिक सलोखा जपण्याचा संदेश देतो. मकरसंक्रांत म्हणजे सूर्य मकर राशीत प्रवेश करतो, उत्तरायणाची सुरुवात होते. कृषीप्रधान भारतासाठी हा क्षण अत्यंत महत्त्वाचा. थंडीचा कडाका ओसरू लागतो, दिवस मोठे होतात आणि शेतीला नव्या आशेची पालवी फुटते. शेतकऱ्याच्या आयुष्यातील कष्टाचा काळ मागे पडत, नव्या हंगामाची चाहूल लागते. त्यामुळेच हा सण केवळ पंचांगापुरता नसून, मातीशी जोडलेला आहे.



तिळसंक्रांतीचा आत्मा म्हणजे तिळगूळ. तीळ आणि गूळ दोन्हीही आरोग्यदायी, शरीराला उष्णता देणारे. थंडीच्या दिवसात शरीराला बळ देणारे. पण या खाद्यपदार्थामागे केवळ पोषणमूल्य नाही, तर सामाजिक संदेश आहे. तीळ काळे असले तरी गूळ त्यांना गोडवा देतो. माणसाच्या आयुष्यातील कटुता, मतभेद, गैरसमज हे तिळासारखे असतात; पण संवाद, प्रेम आणि आपुलकीचा गूळ त्यांना गोड बनवतो. तिळगूळ घ्या आणि गोड गोड बोला ही केवळ शुभेच्छा नाही, तर समाजातील ताणतणाव विसरून एकमेकांशी प्रेमाने वागण्याची विनंती आहे. आज सोशल मीडियाच्या काळात शब्द जखमा करतात, टीका वाढते; अशा वेळी तिळगुळाचा हा संदेश अधिकच समर्पक ठरतो. महाराष्ट्रात तिळसंक्रांतीला वाण देण्याची प्रथा विशेष महत्त्वाची आहे. गृहिणी एकत्र येतात, हळदी-कुंकू लावतात, वाण देतात. ही प्रथा केवळ धार्मिक नाही; ती स्त्री-सामाजिकतेची शक्ती दर्शवते. वाणामध्ये तीळ, गूळ, साखर, फुलं, भांडी, कापड यांचा समावेश असतो. काळानुसार स्वरूप बदलले; पण भाव कायम राहिला. घराघरांतील नाती घट्ट करणारा हा सण आहे. नव्या सूनबाईंना समाजात सामावून घेणारा, वृद्ध महिलांना मान देणारा आणि मैत्रीचा धागा घट्ट करणारा हा सोहळा आहे. आजच्या धावपळीच्या जीवनात स्त्रियांना एकत्र येण्यासाठी वेळ कमी मिळतो. अशा वेळी तिळसंक्रांत ही संवादाची, अनुभवांची देवाणघेवाण घडवणारी पर्वणी ठरते.

उत्तर भारतात मकरसंक्रांत म्हणजे पतंगोत्सव. गुजरात, राजस्थान, उत्तर प्रदेशात आकाश रंगीबेरंगी पतंगांनी भरून जातं. पतंग उडवणं म्हणजे केवळ खेळ नाही; ते स्वातंत्र्याचं, स्पर्धेचं आणि आनंदाचं प्रतीक आहे. लहानग्यांपासून वृद्धांपर्यंत सर्वजण छतावर, मैदानावर एकत्र येतात. काय पो छे!चा जल्लोष, ढोल-ताशांचा गजर, संगीत, हास्य समाज एक क्षण तरी एकत्र येतो. तुटलेल्या नात्यांना जोडणारा हा सण आहे. मात्र आज पतंगोत्सवाबाबत पर्यावरणीय जाणीवही तितकीच महत्त्वाची ठरते. चायनीज मांजा, पक्ष्यांचे जीव, अपघात यामुळे आनंदाला जबाबदारीची किनार लागते. पर्यावरणपूरक पतंगोत्सव ही काळाची गरज आहे. तिळसंक्रांत हा सण जाती-धर्माच्या भिंती ओलांडतो. तिळगूळ देताना कुणाचा धर्म विचारला जात नाही, वाण देताना कुणाची जात पाहिली जात नाही. हा सण समानतेचा आहे. संतपरंपरेतही संक्रांतीचं महत्त्व दिसून येतं. संतांनी गोड बोलण्यावर, अहंकार टाकून देण्यावर भर दिला. आज समाजात द्वेष, ध्रुवीकरण वाढत असताना तिळसंक्रांत आपल्याला मानवतेचा धडा देतो.

आज तिळगूळ व्हॉट्सपवरच्या शुभेच्छांपुरता मर्यादित होतोय, हळदी-कुंकू ऑनलाईन गिफ्ट्समध्ये बदलतंय, पतंग मोबाइल गेममध्ये अडकतोय. बदल अटळ आहे; पण भाव हरवता कामा नये. संक्रांत म्हणजे केवळ सण नाही, ती संवादाची संधी आहे. शेजाऱ्याशी बोलण्याची, नात्यांतली कटुता मिटवण्याची, जुन्या आठवणींना उजाळा देण्याची संधी. तिळसंक्रांत आपल्याला शिकवते, शब्द गोड ठेवा, मन स्वच्छ ठेवा आणि नाती घट्ट ठेवा. तिळगुळाचा गोडवा, वाणाची आपुलकी आणि पतंगांचा उन्मुक्त आनंद हे सगळं मिळून तिळसंक्रांत केवळ सण न राहता माणुसकीचा उत्सव बनतो. आज समाज तणावग्रस्त आहे, संवाद तुटतोय, मतभेद वाढत आहेत. अशा काळात तिळसंक्रांत अधिक अर्थपूर्ण ठरते. कारण हा सण सांगतो की, भांडणं विसरा, अहंकार सोडा, गोड गोड बोला आणि कदाचित याच साध्या तत्त्वज्ञानात आपल्या समाजाचं मोठं उत्तर दडलेलं आहे. तिळगुळाचा गोडवा तुमच्या शब्दांतून, वाणाची उदारता तुमच्या कृतीतून आणि पतंगासारखी उंच भरारी तुमच्या स्वप्नांतून सदैव झळकत राहो. नव्या उत्तरायणात आयुष्य अधिक प्रकाशमान, नातेसंबंध अधिक मधुर आणि भविष्य अधिक आशादायी व्हावे, हीच मनापासून तिळसंक्रांतीच्या हार्दिक शुभेच्छा!

**– प्रविण बागडे**, नागपूर, भ्रमणध्वनी : ९९२३६२०९१९

# मानवता आणि समतेचे सुवर्णशिखर: श्री हरमंदिर साहिब


भारतीय उपखंडाच्या इतिहासात अशी मोजकीच स्थळे आहेत, जी केवळ धार्मिक श्रद्धास्थान न राहता मानवी मूल्यांचा दीपस्तंभ बनली आहेत. अमृतसरचे 'श्री हरमंदिर साहिब' अर्थात सुवर्ण मंदिर हे त्यापैकीच एक. चोहोबाजूंनी पसरलेले पवित्र अमृत सरोवर, त्यामध्ये झळाळणारे सुवर्ण मंदिर आणि कानावर पडणारे गुरबानीचे शांत स्वर हे केवळ दृश्य नसून तो एक आध्यात्मिक अनुभव आहे जो शतकानुशतके जगाला शांती आणि बंधुत्वाचा संदेश देत आहे

**सूफी संतांच्या हस्ते पायाभरणी:**

सर्वधर्मसमभावाचा वारसा या पवित्र वास्तूचा पायाच मुळी सामाजिक सलोख्यावर आधारलेला आहे. १५७७ मध्ये शीख धर्माचे चौथे गुरू गुरू रामदास साहिब यांनी या शहराचा पाया रचला. मात्र, मंदिराच्या निर्मितीचा संकल्प पाचवे गुरू गुरू अर्जुन देव साहिब यांनी पूर्णत्वास नेला. या मंदिराचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे, शिखांच्या या सर्वोच्च केंद्राची पायाभरणी एका मुस्लिम सूफी संताच्या, म्हणजेच हजरत मियाँ मीर साहिब यांच्या हस्ते करण्यात आली. हा प्रसंग आजही भारतीय संस्कृतीतील 'गंगा-जमुनी' तहजीबचा सर्वात मोठा पुरावा मानला जातो. वास्तुरचनेत दडलेली नम्रता आणि समानता जगातील बहुतेक धार्मिक स्थळे ही उंचीवर किंवा पर्वतावर असतात, परंतु श्री हरमंदिर साहिबची रचना वैशिष्ट्यपूर्ण आहे. हे मंदिर जमिनीच्या पातळीपेक्षा खाली बांधले गेले आहे, जे 'नम्रतेचे' प्रतीक आहे. मंदिरात प्रवेश करण्यासाठी भाविकाला पायऱ्या उतरून जावे लागते, याचाच अर्थ ईश्वराच्या दारात येताना अहंकार त्यागून येणे आवश्यक आहे. तसेच, मंदिराची चार प्रवेशद्वारे हे दर्शवतात की, येथे येण्यासाठी जात, धर्म, वर्ण किंवा लिंगाचा कोणताही अडथळा नाही; हे द्वार सर्वांसाठी सदैव खुले आहे.

**महाराजा रणजित सिंह आणि 'सुवर्ण' झळाळी**

सुरुवातीला साध्या रचनेत असलेल्या या वास्तूला १९ व्या शतकात खऱ्या अर्थाने सुवर्ण झळाळी मिळाली. शिखांचे महान शासक महाराजा रणजित सिंह यांनी या मंदिराच्या घुमटावर आणि भिंतींवर सोन्याचे पत्रे अर्पण केले. तेव्हापासून हे श्री



'हरमंदिर साहिब' सातासमुद्रापार 'गोल्डन टेम्पल' म्हणून ओळखले जाऊ लागले. सुवर्ण मंदिर हे केवळ शिखांचे नाही, तर ते अखिल मानवजातीचे आध्यात्मिक आश्रयस्थान आहे.

**लंगर**

जगातील सर्वात मोठी सेवा संस्कृती सुवर्ण मंदिराचा उल्लेख 'लंगर' सेवेशिवाय अपूर्ण आहे. कोणताही भेदभाव न करता, एकाच पंगतीत बसून हजारो लोक येथे प्रसाद ग्रहण करतात. ही परंपरा केवळ भूक भागवण्यासाठी नसून ती समाजातील उच्च-नीचतेची भिंत पाडण्यासाठी सुरू करण्यात आली आहे. सेवा, त्याग आणि समर्पण या त्रिसूत्रीवर आधारलेली ही व्यवस्था आजही जगाला अचंबित करते. आधुनिक भारताचे सांस्कृतिक वैभव १६०४ मध्ये गुरू अर्जुन देव साहिब यांनी येथे 'आदि ग्रंथाची' प्रतिष्ठापना केली आणि हे स्थळ आध्यात्मिक ऊर्जेचे केंद्र बनले. आज २१ व्या शतकातही, हे मंदिर आपल्या मूळ मूल्यांशी घट्ट जोडलेले आहे. भारतीय लोकशाहीतील समानता आणि सहिष्णुतेचा आत्मा हरमंदिर साहिबमध्ये खऱ्या अर्थाने प्रतिबिंबित होतो.

**– राहुल शोभाबाई लक्ष्मणराव भालेराव,**
जिल्हा माहिती अधिकारी, पालघर

# इंडियन आर्मी डे

१५ ऑगस्ट १९४७ रोजी आपला भारत देश स्वातंत्र्य झाला. देश स्वातंत्र्य करण्यासाठी लाखो ज्ञात - अज्ञात स्वातंत्र्य सैनिकांनी आपल्या प्राणाचे बलिदान दिले. हजारो, लाखो स्वातंत्र्य सैनिकांच्या बलिदानानंतर मिळालेले हे स्वातंत्र्य अबाधित ठेवण्याची जबाबदारी भारतीय लष्कराची आहे. भारतीय लष्कराने आपली जबाबदारी इमाने इतबारे पार पाडत देशातील परकीय आक्रमणे रोखून धरली. केवळ रोखून धरलीच नाही तर भारताच्या सार्वभौमत्वाला आव्हान देणाऱ्या शत्रू राष्ट्रांना दाती तृण धरायला लावले.

भारतीय लष्कराविषयी देशातील १४४ कोटी जनतेला नितांत आदर आहे. भारतीय लष्कराचे भूदल, नौदल व वायुदल हे तीन प्रमुख विभाग आहेत. भूदल अर्थात भारतीय आर्मीचे जवान देशाच्या सीमांचे रक्षण करतात.

आज १५ जानेवारी, आजचा दिवस संपूर्ण देशात भारतीय लष्कर दिन अर्थात इंडियन आर्मी डे म्हणून साजरा केला जातो. चला तर मग आजच्या भारतीय लष्कर दिनानिमित्त आपण या लेखातून भारतीय लष्कराची माहिती घेऊ या.



भारतीय लष्कराचा मूळ पाया व अंतर्गत गाभा हा ब्रिटिश आर्मीवर आधारलेला आहे. याच ब्रिटिशांकडून १५ जानेवारी १९४९ ला तत्कालीन फील्ड मार्शल के एम करिअप्पा यांनी पदभार स्वीकारला त्यामुळे हा दिवस भारतीय लष्कर दरवर्षी आर्मी डे म्हणून साजरा करते. भारतीय लष्कर ही प्रशंसनीय काम केलेली सन्माननीय संस्था आहे व आंतरराष्ट्रीय पातळीवरही आपल्या लष्कराला मान आहे. भारतीय लष्कराची एक प्रतिमा आहे, ती चांगली आहे. भारतीय लष्कराची नेहमीच प्रशंसा झालेली असून लष्कराने देशांतर्गत व आंतरराष्ट्रीय आव्हानांचा सामना करताना आदर्श कामगिरी केली आहे. संयुक्त राष्ट्रसंघाच्या शांती रक्षक सेनेत भारतीय लष्कराची मोठी भुमिका आहे. आंतरराष्ट्रीय समुदायाने भारतीय लष्कराच्या कामाची नेहमीच स्तुती केली आहे.

भारतीय लष्कर हे केवळ शक्तिप्रदर्शनासाठी नाही. या संस्थेकडे एक परिपक्वता आणि जबाबदारीही आहे. भारतीय लष्कर हे आज जगातील सर्वात शक्तिशाली लष्कर म्हणून ओळखले जाते. केवळ शत्रू राष्ट्रच नव्हे तर अमेरिका, रशिया, चीन यासारखी बलाढ्य राष्ट्रही भारतीय लष्कराची क्षमता जाणून आहे. देशातील १४४ कोटी जनतेचे रक्षण करण्यास भारतीय लष्कर सक्षम आहे. भारतीय लष्कराच्या सर्व जवानांना लष्कर दिनाच्या अर्थात इंडियन आर्मी डे च्या हार्दिक शुभेच्छा! तसेच देशासाठी शहीद झालेल्या भारतीय लष्कराच्या जवानांना विनम्र अभिवादन!! जय हिंद!!!

**– श्याम ठाणेदार,** दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५

# राष्ट्रीय भूगोल दिन

आज १४ जानेवारी, आजचा दिवस संपूर्ण देशात राष्ट्रीय भूगोल दिन म्हणून साजरा केला जातो हे खूपच कमी लोकांना माहित आहे. भूगोल हा विषय आपण लहान वयापासूनच शिकत आलो असूनही भूगोलाचे परिपूर्ण ज्ञान आपल्याला अजूनही मिळवता आले नाही. डॉ सी डी देशमुख हे भूगोल विषयातील अत्यंत जाणकार व्यक्ती मानले जातात. त्यांचे भूगोलातील ज्ञान अफलातून होते म्हणूनच त्यांना भूगोल महर्षी असे म्हटले जाते. भूगोल महर्षी सी डी देशमुख यांचा १४ जानेवारी हा जन्मदिवस. भूगोल विषयात त्यांनी केलेले कार्य अतुलनीय असे आहे. त्यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ हा दिवस राष्ट्रीय भूगोल दिन म्हणून साजरा केला जातो.

भूगोल दिनाच्या निमित्ताने विविध उपक्रम साजरे केले जातात. भूगोल या शब्दाचा सरळ अर्थ पृथ्वीचा गोल असा होतो. भूगोल हा शब्द इंग्रजीतील ऋश्चेसीरहि या शब्दासाठी पर्याय वापरला जातो. लॅटिन वरून आलेल्या या शब्दाचा अर्थ भुवर्णन शास्त्र. पृथ्वीवरील भौतिक व मानवी पर्यावरणातील रचना, क्रिया व आंतरक्रिया यांचा अभ्यास म्हणजे भूगोल असे स्थूलमानाने मानले जाते. भूगोल म्हणजे मानव व पर्यावरण यांचा संबंध शोधणारे शास्त्र अशी देखील भूगोलाची व्याख्या केली जाते.

भूगोलाची तीन गटात विभागणी केली आहे.

१ ) प्राकृतिक भूगोल
२ ) मानवी भूगोल
३ ) प्रादेशिक भूगोल

प्राकृतिक भूगोलात भूरूप शास्त्र, हवामान शास्त्र, जैविक शास्त्र यांचा समावेश होतो. यासोबत किनारी प्रदेश, खनिज शास्त्र आणि नैसर्गिक आपत्ती यांचाही समावेश होतो.



मानवी भूगोलात ऐतिहासिक भूगोल, सांस्कृतिक व सामाजिक भूगोल, लोकसंख्या, आर्थिक व राजकीय भूगोलाचा समावेश होतो.

प्रादेशिक भूगोलात पर्यावरणाचे व्यवस्थापन आणि विविध संसाधन स्त्रोतांचे जनन व संवर्धन यांचा समावेश होतो.

भूगोलाच्या सखोल आणि सविस्तर अभ्यासात विविध पद्धतीचा समावेश केला जातो. प्रत्यक्ष क्षेत्र, निरीक्षण, नकाशे यांना भूगोलात महत्वाचे स्थान आहेच पण आजकाल दुरसंवेदी कृत्रिम उपग्रह, द्रोण कॅमेरे, हवाई चित्रीकरण यांनी भूगोलाच्या निरीक्षण क्षमतेत भर घातली आहे. मानवी जीवनात भूगोलाचे महत्व अनन्यसाधारण आहे. आपण जगतो ते जग, त्याचे स्वरूप विविध प्रदेश, देश, तेथील लोकजीवन यांचे ज्ञान आपल्याला भूगोलामुळेच होते.

**– श्याम ठाणेदार,** दौंड जिल्हा पुणे (९९२२५४६२९५)

# पतंग खेळच बंद करावा?

अलिकडील काळात पतंगानं गळे कापत आहेत. जीव जात आहेत. पशुपक्षी जखमी होत आहेत. त्यांचे जीवन जात आहेत. एकंदरीत सांगायचं झाल्यास बरेच नुकसान होत आहेत. हे पाहता असं वाटायला लागलं आहे की हा पतंग उडविण्याचा खेळच कायमचा बंद करुन टाकावा.*

सरकार राबवीत आहे नायलॉन मंजा बंद करण्याचा उपक्रम. लोकं सर्रास नायलॉन मंजा वापरत आहेत. जो मंजा सडत नाही. खराब होत नाही व वर्षानुवर्ष टिकून राहतो. ज्या मंजानं अनेकांचे गळे कापले जातात. अनेक पक्षी त्या मंज्यात लटकून त्यातून सुटका न झाल्यानं उपासानं व विना अन्नपाण्यानं मरण पावतात.

सरकारचं म्हणणं आहे की नायलॉन मंजावर बंदी आणणं. परंतु पतंग हा लोकांचा आवडता खेळ असल्यानं सरकारनं जरी नायलॉन मंजावर बंदी घातली तरी या नायलॉन मंज्याची विक्री लोकं लपूनछपून करतातच. करीत आहेत व लोकांचे गळे कापले जात आहेत.

नायलॉन मंज्याच्या अनुषंगानं विचार केल्यास पुर्वी पतंग उडत नव्हते काय? उडत होते. मग त्यात जो मंजा वापरला जात होता, तो घातक नव्हता काय? तो घातकच होता. कारण त्यात काच राहात होता. परंतु त्यावर बंदी घातली गेली नव्हती. कारण त्यात काच जरी असला तरी ते धागे कालांतरानं कुजत असत व नष्ट होत असत. याचा अर्थ असा नव्हता की ते धागे माणसाचे आजच्यासारखे गुण कापत नव्हते.



तसेच त्याच धाग्यात आजच्यासारखे पशुपक्षी लटकून पडत नव्हते.

अलीकडील काळात पतंग उडविणे या खेळाला लोकं जास्त महत्व देवू लागले आहेत. पतंग उडविण्याचा छंदही तसा वाढत चाललेला आहे. यातूनच माणसांचे गळेच कापले जात नाहीत तर पशुपक्षांचेही जीवच जात आहेत.

सरकार राबवीत आहे नायलॉन मंजा बंद करण्याचा उपक्रम. लोकं सर्रास नायलॉन मंजा वापरत आहेत. जो मंजा सडत नाही. खराब होत नाही व वर्षानुवर्ष टिकून राहतो. ज्या मंजानं अनेकांचे गळे कापले जातात. अनेक पक्षी त्या मंज्यात लटकून त्यातून सुटका न झाल्यानं उपासानं व विना अन्नपाण्यानं मरण पावतात.

सरकारचं म्हणणं आहे की नायलॉन मंजावर बंदी आणणं. परंतु पतंग हा लोकांचा आवडता खेळ असल्यानं सरकारनं जरी नायलॉन मंजावर बंदी घातली तरी या नायलॉन मंज्याची विक्री लोकं लपूनछपून करतातच. करीत आहेत व लोकांचे गळे कापले जात आहेत.

नायलॉन मंज्याच्या अनुषंगानं विचार केल्यास पुर्वी पतंग उडत नव्हते काय? उडत होते. मग त्यात जो मंजा वापरला जात होता, तो घातक नव्हता काय? तो घातकच होता. कारण त्यात काच राहात होता. परंतु त्यावर बंदी घातली गेली नव्हती. कारण त्यात काच जरी असला तरी ते धागे कालांतरानं कुजत असत व नष्ट होत असत. याचा अर्थ असा नव्हता की ते धागे माणसाचे आजच्यासारखे गळे कापत नव्हते. तसेच त्याच धाग्यात आजच्यासारखे पशुपक्षी लटकून पडत नव्हते. ते धागे त्यावेळेसही माणसाला क्षति पोहोचवीत होते आणि त्या धाग्यानही पशुपक्षी मरण पावत होते.

पतंग हा खेळ राष्ट्रीय नाही. म्हणतात की तो खेळ चीनमधून आला. तसा तो खेळ वाईटच. कारण पतंग कटल्यानंतर ती पतंग उडत उडत लांब अंतरावरुन जमीनीवर पडते आणि ती पडतांना माणसाला क्षति पोहोचवते. यामुळंच हा खेळच मुळात बंद करायला हवा. नायलॉन मंजावर बंदी आणण्याऐवजी. कारण या खेळात फक्त क्षणीक सुख मिळत असते. मात्र दुःख पाहता जन्मभराचं होते. कुणाचा एकुलता एक लहान मुलगा मरण पावतो तर कुणाच्या घरचा मोठा जीव मरण पावतो. जो कमवता असतो. मग तो नायलॉन मंजा का असेना आणि साधा मंजा का असेना. मंजा विचारच करीत नाही की मी नायलॉन आहे वा मी साधा आहे.

देशानं नायलॉन मंजावर बंदी घालणं हा व्यक्तीगत अधिकार आहे. भारतीय संविधानानं बहाल केलेला. भारतीय संविधानात अनुच्छेद १९ ते २२ मध्ये काही कलमानुसार आपल्याला स्वंतत्र्य वागण्याचे अधिकार दिले आहेत. स्वतंत्र्य व मुक्त विहार करण्याचे अधिकार. त्यात कलम २१ मध्ये व्यक्तीगत स्वातंत्र्य बहाल केले गेले आहे. पतंग उडविणे हा आपला व्यक्तीगत स्वातंत्र्याचा अधिकार आहे. त्यामुळंच त्यावर बंदी आणता येत नाही. परंतु त्या छंदानं जर कुणाचे जीव जात असेल तर असे छंद कोणत्या कामाचे? असे छंद वा खेळ बंद केलेले बरे. उदाहरणार्थ एखाद्यानं जर म्हटलं की मला अनुच्छेद १९ ते २२ नुसार व्यक्तीगत स्वातंत्र्याचे अधिकार आहेत. मला त्यानुसार मुक्तपणे वागता येते. त्याच वागण्यातून मला हत्या करायची आहे. तर हत्या करण्याचा अधिकार अनुच्छेद १९ ते २२ बहाल करीत नाहीत. पतंग उडविणे ह्या गोष्टीही अशा हत्येच्याच प्रकारात बसतात. त्यामुळंच तसे खेळच मुळात बंद करण्याची गरज आहे. फक्त नायलॉन मंजा बंद करणे नाही. त्यासाठी केवळ जनजागृतीचीच गरज नाही तर तसा कायदा बनविण्याची गरज आहे. जेणेकरुन शेकडो लोकांचे प्राण वाचवता येईल. पशुपक्षाचेही प्राण वाचवता येतील.

महत्वाचं सांगायचं झाल्यास पतंग हा खेळ जरी लोकांना रोजगार देणारा असला तरी तो विध्वंसक खेळ आहे. असे खेळ बंद केलेले बरे. ते खेळ जर बंद झाले तर भविष्यातील कित्येक लोकांचे प्राण वाचवता येवू शकतील हे तेवढंच खरं. तशी बंदी आणल्यास लोकं नक्कीच भडकतील. परंतु काही दिवसानंतर हळूहळू सवय पडेल व तद्नंतर लोकांना वाटेल की ही गोष्ट बरी झाली की पतंग उडविण्याचा छंद बंद झाला.

पतंग उडविणे हा छंद असून तो छंद बंद करणे अतिशय आवश्यक आहे. तो बंद केल्यास उद्या भावी पिढी आपले उपकारच मानतील. म्हणतील की प्राणी पक्षांचा जीवाची आमच्याही जुन्या पिढीनं दखल घेतली व पतंग उडविण्याचा खेळ बंद केला म्हणून बरे झाले.

**– अंकुश शिंगाडे,** नागपूर ९३७३३५९४५०

# पिंपरखेडा येथे २३ वा 'जिजामाता महोत्सव' उत्साहात संपन्न; माजी विद्यार्थ्यांचा 'जिजामाता भूषण' पुरस्काराने गौरव

**आत्ताच एक्सप्रेस**

**कन्नड (प्रतिनिधी)** तालुक्यातील पिंपरखेडा येथे जिजामाता शिक्षण प्रसारक मंडळ व शिक्षण महर्षी स्वर्गीय के. के. जाधव सेवाभावी प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने आणि संस्था सचिव सागर जाधव यांच्या संकल्पनेतून सलग २३ व्या 'जिजामाता महोत्सवाचे' आयोजन करण्यात आले होते. राष्ट्रमाता जिजाऊ जयंतीचे औचित्य साधून आयोजित करण्यात आलेल्या या त्रैदिवसीय महोत्सवात विविध सामाजिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमांची रेलचेल पाहायला मिळाली.

महोत्सवाचे दिमाखदार उद्घाटन महोत्सवाचे उद्घाटन माजी आमदार नामदेवराव पवार आणि परिसरातील सरपंच व ज्येष्ठ नागरिकांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी संस्थेचे सचिव सागर जाधव यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.माजी विद्यार्थ्यांचा सन्मान: 'जिजामाता भूषण' पुरस्काराचे वितरण विद्यालयाने घडवलेल्या आणि विविध क्षेत्रांत आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटवणाऱ्या माजी विद्यार्थ्यांचा 'जिजामाता भूषण' पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला. यामध्ये जगदीश निकम (पोलीस निरीक्षक), कल्याणी जाईबहार (भूवैज्ञानिक), काकासाहेब काचोळे (कर्करोग शास्त्र विभाग प्रमुख), ऋषिकेश निकम, ऋषिकेश पवार, अक्षय सोनगिरे (एसबीआय ज्युनियर असोसिएट), मयूर विसपुते, सागर निकम, दीपक गायकवाड, अक्षय कुरणकार, रुपेश खंडागळे, चेतन कुरंकार आणि अनिकेत चव्हाण (केंद्रीय शिक्षा बोर्ड अधीक्षक) यांचा समावेश होता.

जिल्हास्तरीय वक्तृत्व स्पर्धा: ६८ शाळांचा सहभाग महोत्सवाच्या दुसऱ्या दिवशी 'माझे प्रेरणादायी व्यक्तिमत्व' या विषयावर जिल्हास्तरीय वक्तृत्व स्पर्धा पार पडली. या स्पर्धेत जिल्ह्यातील ६८ प्राथमिक व माध्यमिक शाळांमधील विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. आयपीएस अपराजिता अग्निहोत्री आणि पिशोरचे पोलीस निरीक्षक शिवाजीराव नागवे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की, शालेय स्तरावरील अशा स्पर्धांमुळे विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्वाचा विकास होतो.

बक्षीस वितरण प्रसंगी उपजिल्हाधिकारी (परतूर) पद्माकर गायकवाड यांनी विद्यार्थ्यांना मोलाचा सल्ला दिला. संकटांचा सामना करत प्रत्येक संधीचे स्वागत करणारा विद्यार्थी आयुष्यात नक्कीच यशस्वी होतो, असे त्यांनी प्रतिपादन केले. यशस्वी गुणवंतांना रोख रक्कम, स्मृतिचिन्ह आणि प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. संजय शिरसाट, अमेय अहिरे आणि सचिन भामरे यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले.सांस्कृतिक मेजवानी: वार्षिक स्नेहसंमेलन तिसऱ्या दिवशी



वार्षिक स्नेहसंमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. याचे उद्घाटन वैजापूरचे मुख्याधिकारी (उज) भागवत बिघोत आणि पोलीस निरीक्षक शिवाजी नागवे यांच्या हस्ते झाले. यावेळी विद्यार्थ्यांनी 'देवा श्री गणेशा', 'माऊली माऊली', 'एकच राजा इथे जन्मला' यांसारखी गाणी, पोवाडे आणि देशभक्तीपर गीते सादर केली. तसेच प्लास्टिक मुक्ती, व्यसनमुक्ती आणि बालकामगार प्रथेवर आधारित पथनाट्यांनी उपस्थितांची मने जिंकली. ग्रामस्थांनी विद्यार्थ्यांच्या कलेचे कौतुक करत बक्षिसांचा वर्षाव केला.कार्यक्रमाची यशस्वीता या संपूर्ण महोत्सवाचे सूत्रसंचालन विलास लोखंडे यांनी केले, तर मुख्याध्यापक बी. सी. निकम यांनी आभार मानले. महोत्सवाच्या यशस्वीतेसाठी पर्यवेक्षक सी. एल. दाबके, वरिष्ठ लिपिक आजिनाथ जाधव, गणेश जाधव, विकास पवार, वैशाली जाधव, श्रीमती शिंपी, कविता बारहाते, वैशाली सोनवणे, एन. एम. वरडे, आर. आर. निकम, एस. सोनवणे, ए. एल. जाधव, व्ही. बैरागी आणि एम. उसरे यांच्यासह सर्व शिक्षक व कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाला पिंपरखेडा परिसरातील ग्रामस्थ व महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

## संक्षिप्त

### छत्रपती शाहू महाराज महाविद्यालयात विद्यापीठ नामविस्तार दिन साजरा



**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर/ प्रतिनिधी/** सिल्लोड शिक्षण संस्था संचलित छत्रपती शाहू महाराज कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, एन-११ हडको येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचा ३२ वा नामविस्तार दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

अभिवादन व प्रमुख उपस्थिती: या कार्यक्रमाप्रसंगी सिल्लोड शिक्षण संस्थेचे सचिव डॉ. राहुल म्हस्के यांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. शितल गायकवाड यांची प्रमुख उपस्थिती होती. उपस्थित मान्यवर: या सोहळ्याला महाविद्यालयातील प्रा. मनोज जाधव, प्रा. डॉ. पल्लवी साबळे, प्रा. डॉ. अश्विनी सोनोने, प्रा. डॉ. रोहिणी भाग्यवंत, प्रा. अनिल खंडारे, प्रा. आशा घटगे, प्रा. क्षितिजा लांडगे, डॉ. कल्पना काळे, प्रा. योगेश नरवडे, प्रा. गोरखनाथ शेळके यांसह शिक्षकेत्तर कर्मचारी पूजा पगारे आणि संतोष म्हस्के यांची उपस्थिती होती.

### जायंट्स पायोनियर्स ग्रुपच्या अध्यक्षपदी अजय अग्रवाल; सामाजिक कार्याचा धडाका सुरूच राहणार

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर/ प्रतिनिधी/** शहरातील अग्रगण्य सामाजिक संस्था असलेल्या 'जायंट्स ग्रुप ऑफ छत्रपती संभाजीनगर पायोनियर्स'च्या वर्ष २०२६ च्या नूतन कार्यकारिणीची घोषणा करण्यात आली आहे. संस्थेच्या अध्यक्षपदी अजय अग्रवाल तर सचिवपदी अनुप अग्रवाल यांची निवड करण्यात आली असून, नुकताच त्यांचा पदभार सोहळा मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न झाला.



अजय अग्रवाल (अध्यक्ष), अनुप अग्रवाल (सचिव), क्रांती डागा (उपाध्यक्ष), स्वप्ना वलसेकर (उपाध्यक्ष), हरीष अग्रवाल (कोषाध्यक्ष)

**नूतन कार्यकारिणी २०२६ :** माजी अध्यक्षा शीतल अग्रवाल यांनी नूतन पदाधिकाऱ्यांच्या निवडीची घोषणा केली. कार्यकारिणीमध्ये खालील सदस्यांचा समावेश आहे: अध्यक्ष: अजय अग्रवाल, सचिव: अनुप अग्रवाल, उपाध्यक्ष: स्वप्ना वलसेकर, क्रांती डागा, कोषाध्यक्ष: हरीष अग्रवाल संचालक मंडळ: अभय शहा, निरज कलंत्री, आशीष सुराणा, विशाल कांकरिया, मुकुल गोयल, स्वस्तीक मिनीयार, साशीमा जैस्वाल, श्वेता सोमाणी, शीतल पांडे, पल्लवी नारखेडे, रुपाली सफला, रुचिका जैस्वाल. मार्गदर्शक: अमित मालाणी, नितीन अग्रवाल, नितीन भालानी, रितेश अग्रवाल.

**महत्त्वाचे संकल्प आणि उपक्रम :** नूतन कार्यकारिणीने आपल्या कार्यकाळात समाजकार्यासोबतच शिक्षण आणि आरोग्यावर विशेष भर देण्याचे जाहीर केले आहे. यामध्ये प्रामुख्याने: १. शाळा दत्तक योजना: गारखेडा येथील महानगरपालिकेची शाळा संस्थेमार्फत दत्तक घेण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. २. थॅलेसेमिया मुक्त अभियान: थॅलेसेमिया या आजारावर मात करण्यासाठी मुलांची रक्त तपासणी करून पूर्व नियोजन करण्यावर भर दिला जाणार आहे. ३. पत्रकार गौरव: पत्रकार दिनाचे औचित्य साधून समाजात प्रबोधन करणाऱ्या पत्रकार बांधवांचा व भगिनींचा यावेळी विशेष सत्कार करण्यात आला. समाजहिताचे विविध उपक्रम राबवून वंचितांना न्याय देण्याचा आमचा मानस आहे. - नूतन कार्यकारिणी, जायंट्स पायोनियर्स.

**मान्यवरांची उपस्थिती :** या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून सुनील गोयल, सुभाष देविदान, विनोद शेवतेकर, सूर्यमाला मालाणी, जुगलकिशोर हरकुर, संन्मती जैन आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विनोद अग्रवाल, पंकज वलसेकर, आरती सोनी, निकीता अग्रवाल, अनिता अग्रवाल, पूनम अग्रवाल यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अमित मालाणी व सरीता मालानी यांनी केले.

## नामांतराचा इतिहास जिवंत; फुलंब्रीत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अभिवादन

**आत्ताच एक्सप्रेस**

**फुलंब्री (प्रतिनिधी)** डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ नामांतर दिनाचे औचित्य साधून फुलंब्री शहरात बुधवारी (दि. १४) उत्साहात अभिवादन कार्यक्रम पार पडला. भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकास मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून गौरवपूर्ण अभिवादन करण्यात आले.

**नामांतर लढ्याच्या स्मृतींना उजाळा**

फुलंब्री तालुका भारतीय बौद्ध महासभेच्या वतीने या कार्यक्रमाचे नेटके आयोजन करण्यात आले होते.

१७ वर्षे चाललेल्या प्रदीर्घ नामांतर लढ्यात ज्या बांधवांनी आपल्या प्राणांची आहुती दिली, त्या शहीदांना यावेळी भावपूर्ण मानवंदना देण्यात आली.

उपस्थितांनी नामांतराचा संघर्ष, त्यामागील समतेची विचारधारा आणि सामाजिक न्यायासाठी दिलेला लढा यावर प्रकाश टाकत बाबासाहेबांच्या विचारांप्रती आपली कृतज्ञता व्यक्त केली.

**सामाजिक एकोपा आणि उपस्थिती**

या कार्यक्रमात समाजातील विविध स्तरांतील मान्यवरांनी उपस्थिती लावून सामाजिक समता, बंधुता व न्याय या मूल्यांप्रती आपली निष्ठा व्यक्त केली.

यावेळी प्रामुख्याने उपस्थित असलेले मान्यवर: राजकीय व सामाजिक नेतृत्व: माजी प.स. सभापती जे. पी. शेजवळ, नगरसेवक सुषमेश प्रधान, नगरसेवक जावेद खान, अजय जैस्वाल, प्रशासकीय व कायदेतज्ज्ञ: निवृत्त रेल्वे अधिकारी तेजराव जाधव, ड. आर. एस. काझी, ॲड. संगीता हिवराळे,बौद्ध महासभा पदाधिकारी: तालुकाध्यक्ष संजय हिवराळे, डॉ. के. बी. हिवराळे,इतर मान्यवर: वेणुबाई हिवराळे, कदीर पठाण, इरफान खान, सुखदेव नरवडे, सुरेश गंगावणे, रवी साठे, अशोक गवळे, देवेंद्र गंगावणे, विजय गवळे, जगन प्रधान, वसीम कुरैशी, रियाज शहा, शहरातील सामाजिक कार्यकर्ते, अनुयायी आणि नागरिक मोठ्या संख्येने या सोहळ्याला उपस्थित होते. संपूर्ण परिसर 'डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा विजय असो' आणि 'नामांतर दिनाचा विजय असो' अशा घोषणांनी दुमदुमून गेला होता. शेवटी अत्यंत शिस्तबद्ध वातावरणात सामूहिक बौद्ध वंदना घेऊन कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

## तृतीयपंथी व्यक्तींसाठी हेल्पलाईन

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर/ प्रतिनिधी/**तृतीयपंथी व्यक्तींसाठी केंद्र सरकारने हेल्पाइन तयार केली आहे. या हेल्पलाईनची सेवा विनामूल्य उपलब्ध असून १४४२७ हा या हेल्पलाईनचा क्रमांक आहे,सह सहायक आयुक्त समाजकल्याण आर.एम. शिंदे यांनी कळविले आहे. केंद्र सरकारच्या ट्रान्सजेंडर व्यक्ती (हक्काचे संरक्षण) कायदा,२०१९ व नियम २०२० संपूर्ण लागू देशात लागू झाले आहेत. त्या अनुषंगाने तृतीयपंथीय समाजातील व्यक्तीसाठी केंद्र शासनामार्फत स्वतंत्र पोर्टल तयार करण्यात आले आहे. या पोर्टलवर तृतीयपंथीयासाठी नॅशनल हेल्पाइन क्रमांक-१४४२७ देण्यात आला आहे. तरी तृतीयपंथी व्यक्तींनी हेल्पलाइन चा वापर करावा असे आवाहन सहायक आयुक्त आर.एम. शिंदे यांनी केले आहे.

## सायलेन्सरमधून फटाक्यांसारखा आवाज काढणाऱ्या बुलेटस्वारांवर पोलिसांची 'संक्रांत'; वैजापूर पोलिसांचा दणका

**आत्ताच एक्सप्रेस**

**वैजापूर /सुयोग वाणी/**बुलेटच्या सायलेन्सरमधून फटाक्यांसारखा कर्णकर्कश आवाज काढून सार्वजनिक शांततेचा भंग करणाऱ्या हुल्लडबाज बुलेटस्वारांवर वैजापूर पोलिसांनी बुधवारी मोठी कारवाई केली. मकर संक्रांतीच्या पार्श्वभूमीवर पोलिसांनी राबवलेल्या या विशेष मोहिमेमुळे शहरातील बेशिस्त वाहनधारकांचे धाबे दणाणले आहेत. या कारवाईत ८ बुलेट जप्त करून त्यांच्याकडून ८ हजार रुपयांचा दंड वसूल करण्यात आला आहे.वैजापूर शहरात गेल्या काही दिवसांपासून काही तरुण आपल्या बुलेटच्या सायलेन्सरमध्ये बेकायदेशीर बदल करून शहरात सुसाट गाड्या चालवत होते. या आवाजामुळे लहान मुले, वृद्ध आणि विशेषतः रुग्णांना मोठा मनस्ताप सहन करावा लागत होता. नागरिकांच्या वाढत्या तक्रारींची गंभीर दखल घेत पोलीस निरीक्षक सत्यजीत ताईतवाले यांनी अशा बुलेटस्वारांवर कारवाई करण्यासाठी विशेष पथके तैनात केली होती.

वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांनी शहराच्या मुख्य चौकांमध्ये सापळा रचला. या मोहिमेत एकूण ८ बुलेट (चक २० एद ३७८१, चक २० एछ ४००७, चक २० ऋ- ०७४९, चक २० ऋछ ११७०, चक २० ऊङ ००९८, चक १२ छढ ९५७८, चक २० ऊक ६९५०, चक २० ऋट ६६११) पकडण्यात आल्या. तपासणीअंती या सर्व वाहनांचे सायलेन्सर बदलल्याचे निष्पन्न झाले. मोटार वाहन अधिनियमानुसार या सर्व वाहनधारकांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली. पोलीस निरीक्षक ताईतवाले यांनी तरुणांना आवाहन केले आहे की, ज्यांनी आपल्या बुलेटला कर्णकर्कश आवाज करणारे सायलेन्सर बसवले आहेत, त्यांनी ते स्वतःहून काढून टाकावेत.

## नालंदा बी.सी.ए. महाविद्यालयात विद्यापीठ नामविस्तार दिन साजरा

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर/ प्रतिनिधी/** येथील एन-११ हडको भागातील नालंदा बी.सी.ए. महाविद्यालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचा ३२ वा नामविस्तार दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.



**प्रमुख उपस्थिती व अभिवादन:** कार्यक्रमाच्या सुरुवातीला सिल्लोड शिक्षण संस्थेचे सचिव डॉ. राहुल म्हस्के यांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. या प्रसंगी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रविण मस्के होते. प्रमुख पाहुणे म्हणून क्रांतीवीर काकासाहेब देशमुख महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सोपान एरंडे आणि राष्ट्रीय सेवा योजनेच्या कार्यक्रमाधिकारी प्रा. जयश्री राठोड यांची व्यासपीठावर उपस्थिती होती.

**मार्गदर्शन :** यावेळी बोलताना मुख्य वक्ते डॉ. राहुल म्हस्के म्हणाले की, आज आपण केवळ विद्यापीठाच्या नामाचा उत्सव साजरा करत नसून, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांच्या विजयाचा आणि त्यांच्या कार्याला मिळालेल्या सन्मानाचा उत्सव साजरा करत आहोत. त्यांनी आपल्या भाषणात बाबासाहेबांचे शिक्षण, सामाजिक समता आणि नामांतर लढ्यातील योगदानावर प्रकाश टाकला व उपस्थितांना नामविस्तार दिनाच्या शुभेच्छा दिल्या.

**सहभाग :** कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. मनिषा राकडे यांनी केले, तर आभार प्रदर्शन सुवर्णा कटारे यांनी मानले. या प्रसंगी महाविद्यालयाचे कर्मचारी ऋषिंदर मानकर, समाधान भालेराव, सुधीर बनकर आणि संजय बनकर यांची प्रमुख उपस्थिती होती.

## राजमाता जिजाऊ जयंती व स्वामी विवेकानंद जयंती मोठ्या उत्साहात साजरी

**आत्ताच एक्सप्रेस**

**विहामाडवा/ प्रतिनिधी. माऊली पा. गाभुड/** गुरुकुल इंग्लिश स्कूल अँड ज्युनियर कॉलेज, पैठण येथे १२ जानेवारी रोजी राजमाता जिजाऊ जयंती व स्वामी विवेकानंद जयंती मोठ्या उत्साहात व प्रेरणादायी वाता-वरणात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाची सुरुवात राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमांचे पूजन व दीपप्रज्वलन करून करण्यात आली.



या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेच्या संस्था अध्यक्षा सौ. अश्विनी लखमले विराजमान होत्या. तर सोनल बाहेती व मुब्धेरा शेख प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होत्या. कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या जीवनकार्यावर आधारित भाषणे, कविता व प्रेरणादायी विचार सादर केले. जिजाऊ जयंती निमित्त 'मी जिजाऊ बोलते' ही एकपात्री नाटिका शिक्षिका कार्तिकी रोडगे हिने अत्यंत भावपूर्ण व प्रभावीपणे सादर करून उपस्थितांची मने जिंकली.

प्राथमिक विभागातील मुलींनी राजमाता जिजाऊ यांची, तर मुलांनी स्वामी विवेकानंद यांची वेशभूषा परिधान केली होती. या वेशभूषेमुळे कार्यक्रम अधिक रंगतदार व अर्थपूर्ण झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षा सौ. अश्विनी लखमले यांनी आपल्या मनोगतातून राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या जीवनकार्यावर सखोल प्रकाश टाकत विद्यार्थ्यांना संस्कार, आत्मविश्वास, राष्ट्रप्रेम व चारित्र्यनिर्मितीचे महत्त्व पटवून दिले. प्रमुख पाहुण्यांनीही आपल्या भाषणातून या थोर व्यक्तिमत्त्वांच्या विचारांचा आदर्श विद्यार्थ्यांनी घ्यावा, असे मार्गदर्शन केले.

या कार्यक्रमाचे नियोजन इयत्ता तिसरीच्या विद्यार्थ्यांनी केले होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वैभवी कणसे व चिराग ढालकरी यांनी केले. शीतल खराद मॅडम यांनी प्रेरणादायी मनोगत व्यक्त केले, तर कार्तिकी मॅडम यांनी जिजाऊ वंदना सादर केली. या कार्यक्रमाला बनसोडे मॅडम, गायकवाड मॅडम, विशाखा मॅडम, कणसे मॅडम, देशमुख मॅडम, भक्ती मॅडम, कुलकर्णी मॅडम व वर्षा कोरान्ने मॅडम यांची उपस्थिती लाभली. कार्यक्रमाच्या शेवटी विराज गांगले यांनी आभार प्रदर्शन केले. हा कार्यक्रम विद्यार्थ्यांसह सर्व उपस्थितांसाठी प्रेरणादायी व मार्गदर्शक ठरला.

## डॉ. संजय मुन हे फुले - आंबेडकरी चळवळीचे प्रभावी प्रसारक

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर/ प्रतिनिधी/** डॉ. संजय मुन यांनी लिहिलेले ग्रंथ मौलिक असून पुढील काळात त्यांनी आपले कार्य अधिक जोमाने करावे, त्यांनी साहित्यातून केलेली मांडणी ही समताधिष्ठित समाज व्यवस्थेच्या निर्मितीची असून डॉ. मुन हे बाबासाहेबांच्या संकल्पनेतील फुले-आंबेडकरी चळवळीचे प्रभावी प्रसारक आहेत, असे गौरोद्गगार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नात रमा यशवंतराव आंबेडकर यांचे यांनी काढले.



**- डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नात रमा यशवंतराव आंबेडकर यांचे गौरोद्गार : डॉ. संजय मुन यांचा गौरव सोहळा उत्साहात संपन्न**

त्या रमाई मासिक, रमाई फाऊंडेशन, सूर्यपुत्र भैय्यासाहेब तथा यशवंतराव आंबेडकर प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित डॉ. संजय मुन यांच्या गौरव सोहळ्यात स्थानिक मराठवाडा साहित्य परिषदेच्या सभागृहात आयोजित कार्यक्रमातून बोलत होत्या.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ विचारवंत डॉ. वासुदेव मुलाटे होते. यावेळी डॉ. दासू वैद्य बोलतांना म्हणाले की, सूर्य शोधणारा हा 'मुन' आहे. संजय मुन यांची वृत्ती निवृत्तीची नसून उर्वरित आयुष्य त्यांनी संशोधनासाठी खर्च करावे, असे प्रतिपादन ज्येष्ठ विचारवंत डॉ. दासू वैद्य यांनी केले.

डॉ. ऋषिकेश कांबळे म्हणाले की, संजय मुन यांनी साहित्य आणि आंबेडकरी चळवळीत मोलाचे योगदान दिले आहे. त्यांची मांडणी ही नेहमी चिंतकाची असते. सध्या समाजात मूलगामी चिंतकांची कमतरता आहे. अशा काळात संजय मुन हे मूलगामी चिंतन करणारे महत्त्वाचे विचारवंत आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्वप्नांची माती शत्रूंनी नाही, तर त्यांच्या अनुयायांनीच केली, हे मी अत्यंत धाडसाने सांगतो, असे स्पष्ट मत त्यांनी व्यक्त केले. आंबेडकरी चळवळीला ऊब देण्याचे काम संजय मुन यांनी करावे, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.

## संक्षिप्त

### सेवेतून भक्तीचा मार्ग 'हिंद-दी-चादर' श्री गुरु तेगबहादूर साहिबजी यांच्या शहीदी समागम कार्यक्रमात सेवेच्या माध्यमातून साक्षीदार होवू या

भारतीय इतिहासात धर्म, मानवता, त्याग आणि बलिदान यांचे अद्वितीय प्रतीक म्हणून श्री गुरु तेगबहादूर साहिबजी यांचे नाव अजरामर आहे. धर्मस्वातंत्र्य, मानवमूल्ये आणि सत्यासाठी प्राणार्पण करणारे ते हिंद-दी-चादर म्हणून ओळखले जातात. त्यांच्या या महान शहिदीच्या ३५० व्या शहीदी समागम वर्षानिमित्त नांदेड शहरात २४ व २५ जानेवारी रोजी एक भव्य, ऐतिहासिक आणि आध्यात्मिक कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.
हा भव्य समागम असर्जन परिसरातील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सुमारे ५३ एकर विस्तीर्ण मैदानावर संपन्न होणार असून, देश-विदेशातून जवळपास १० लाखांहून अधिक भाविक या पवित्र समागम कार्यक्रमासाठी नांदेडमध्ये दाखल होणार आहेत. हा केवळ धार्मिक कार्यक्रम नसून, सेवा, समानता आणि मानवतेचा महासंगम ठरणार आहे.

नऊ समाजांचा ऐतिहासिक सहभाग

या ऐतिहासिक शहीदी समागमाचे आयोजन नऊ समाजांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले आहे. राज्य शासनाचा अल्पसंख्याक विभाग, हिंद-दी-चादर श्री गुरु तेगबहादूर साहिबजी ३५० वी शहीदी समागम समिती तसेच सीख, सिकलीकर, बंजारा, लबाना, मोहियाल, सिंधी, वाल्मिकी, उदासीन संप्रदाय आणि भगत नामदेव वारकरी समाज या सर्व समाजांनी एकत्र येत एकतेचा आणि समतेचा आदर्श समाजासमोर ठेवला आहे. ही संयुक्त रचना स्वतः तच गुरूंच्या विचारांची जिवंत साक्ष आहे. सर्व धर्म समान, सर्व मानव समान हा संदेश या आयोजनातून ठळकपणे अधोरेखित होतो.कार्यक्रम स्थळी उभारण्यात येणाऱ्या मुख्य मंडपात दोनही दिवस श्री गुरु ग्रंथसाहिब विराजमान राहणार आहे. गुरूंच्या चरणी नतमस्तक होण्यासाठी येणारे सर्व भाविक, मान्यवर, पदाधिकारी व अतिथी कार्यक्रम स्थळी अनवाणी चालणार आहेत.
ही परंपरा केवळ धार्मिक शिस्त नसून अहंकार त्याग, नम्रता आणि गुरूचरणी समर्पणाची भावना व्यक्त करणारी आहे. लाखो भाविक अनवाणी चालत गुरूच्या दर्शनासाठी येणार, हे दृश्यच सेवेतून भक्तीचा खरा अर्थ उलगडून दाखवणारे ठरणार आहे.
तसेच संत शिरोमणी श्री नामदेव महाराज यांच्या जन्म गाव नरसी नामदेव येथून वारकरी दिंड्या पायी चालत नांदेड येथे समागम स्थळी येणार आहे.या कार्यक्रमाच्या पूर्वतयारीचा एक अत्यंत प्रेरणादायी प्रसंग म्हणजे नुकतेच पार पडलेले भव्य श्रमदान. नांदेडचे जिल्हाधिकारी राहुल कर्डीले यांच्या उपस्थितीत कार्यक्रम स्थळी श्रमदान करण्यात आले. मैदानावरील खडे उचलणे, जमिनीची स्वच्छता करणे, चालण्यासाठी सुरक्षित व्यवस्था करणे ही सर्व कामे सेवाभावाने करण्यात आली.प्रशासन, विद्यार्थी,स्वयंसेवक आणि भाविकांनी एकत्र येऊन केलेले हे श्रमदान सेवेतून भक्तीचा प्रत्यक्ष अनुभव देणारे ठरले. गुरूंच्या शिकवणीनुसार सेवा हीच खरी साधना असल्याचा संदेश या उपक्रमातून समाजापर्यंत पोहोचला.

लंगर : समानतेचा आणि मानवतेचा महासागर

या भव्य शहीदी समागमात भाविकांच्या सोयीसाठी १२ भव्य लंगर उभारण्यात येणार आहेत. प्रत्येक लंगरमध्ये एकावेळी सुमारे ३,००० भाविक बसून भोजन करू शकतील, अशी उत्कृष्ट व्यवस्था करण्यात आली आहे. २४ व २५ जानेवारी रोजी हे लंगर सकाळी ८ वाजल्यापासून रात्री १२ वाजेपर्यंत अखंड सुरू राहणार आहेत.लंगर म्हणजे केवळ अन्नसेवा नाही, तर समानतेची शिकवण आहे. येथे जात, धर्म, भाषा, देश, श्रीमंती-गरिबी यांचा कोणताही भेद न ठेवता सर्वजण एकाच पंक्तीत बसून गुरूचा प्रसाद स्वीकारणार आहेत. हा दृश्य अनुभव गुरू नानक देवजींच्या सर्व मानव समान आहेत या विचाराचा साक्षात्कार घडवणारा असेल.
कार्यक्रम स्थळाच्या चारही बाजूंनी दोन किलोमीटरपर्यंतच्या परिसरात चहा, पाणी, नाश्ता, फळे यांचे विनामूल्य सेवा स्टॉल उभारण्यात येणार आहेत. ही व्यवस्था लाखो भाविकांच्या सोयीसाठी असून, निःस्वार्थ सेवेचा सर्वोच्च आदर्श समाजासमोर ठेवणारी आहे. सेवा करताना कोणताही मोबदला, मान-सन्मान किंवा प्रसिद्धी अपेक्षित नसून, केवळ गुरूंच्या नावाने सेवा करण्याचा आनंद स्वयंसेवक अनुभवणार आहेत.

जुताघर : नम्रतेचा आणि अहंकार त्यागाचा संस्कार

कार्यक्रम स्थळी ८ प्रवेशद्वारांवर ८ जुताघरे उभारण्यात येणार असून, गरजेनुसार त्यांची संख्या वाढवण्यात येणार आहे. लाखो भाविकांच्या पादत्राणांची काळजी घेणे ही एक मोठी जबाबदारी असून, ती सेवा अत्यंत नियोजनबद्ध पद्धतीने पार पाडली जाणार आहे. जुताघर सेवा म्हणजे अहंकाराचा त्याग आणि नम्रतेची साधना. गुरूच्या दरबारात प्रवेश करताना पादत्राणे बाहेर ठेवणे म्हणजे बाह्य वैभव आणि गर्व दारातच ठेवणे होय. ही सेवा माणसाला अंतर्मुख करते आणि समानतेचा खरा अर्थ शिकवते.
या शहीदी समागमात शीख धर्मीयांचा पारंपरिक युद्धकला प्रकार 'गतका' सादर करण्यात येणार आहे. यामध्ये पारंपरिक शस्त्रांचे प्रदर्शन, शौर्य, शिस्त आणि युद्धकलेचे प्रात्यक्षिक पाहायला मिळणार आहे. तसेच नऊ समाजांच्या वतीने पारंपरिक कीर्तन, कथा आणि धार्मिक प्रवचनांचे आयोजन करण्यात येणार असून, त्यातून गुरूंच्या जीवनकार्याचा आणि बलिदानाचा संदेश नव्या पिढीपर्यंत पोहोचवण्यात येणार आहे.या सामगमासाठी दिल्ली अमृतसर, चंदीगड, मुंबई, हैद्राबाद येथून मोफत रेल्वे सेवा राहणार असून तसेच विशेष विमानसेवा दोन्ही दिवस असणार आहे. तसेच कार्यक्रमाच्या ठिकाणी दहा हजार भाविकांच्या निवासासाठी सर्व सुविधायुक्त आदर्श टेन्ट सिटी उभी करण्यात येणार आहेत.
या ऐतिहासिक कार्यक्रमात हेलिकॉप्टरद्वारे पुष्पवृष्टी करण्यात येणार आहे.गुरूंच्या प्रतिकृतीवर आणि भाविकांवर होणारी ही पुष्पवृष्टी म्हणजे श्रद्धेचा, सन्मानाचा आणि कृतज्ञतेचा अभिषेक असेल.
सेवेतून इतिहासाचे साक्षीदार होवू या नांदेड येथे होणारा हा ३५० वा शहीदी समागम म्हणजे केवळ एक धार्मिक कार्यक्रम नसून, सेवा, समानता, बलिदान आणि मानवतेचा महासोहळा आहे.
हिंद-दी-चादर श्री गुरु तेगबहादूर साहिबजी यांचा संदेश आजही तितकाच जिवंत असून, तो या भव्य आयोजनातून संपूर्ण जगाला पुन्हा एकदा दिशा देणार आहे.तसेच या कार्यक्रमासाठी विविध राज्यांचे मुख्यमंत्री, बागेश्वरचे आचार्य , महंत आदी उपस्थित राहणार आहे.चला तर मग, या गौरवशाली ऐतिहासिक कार्यक्रमाचे साक्षीदार बनू या,सेवेत सहभागी होऊ या आणि गुरूंच्या चरणी आपली सेवा अर्पण करण्यासाठी सज्ज होऊया.

**-अलका पाटील**
**उपसंपादक, जिल्हा माहिती कार्यालय, नांदेड**

## जात प्रमाणपत्र पडताळणी समितीतर्फे १ जानेवारी ते २३ जानेवारी २०२६ या कालावधीत विशेष मोहिम

**आत्ताच एक्सप्रेस**
**जालना (प्रतिनिधी)**
सन २०२५-२६ व २०२६-२७ या शैक्षणिक वर्षात राज्य सामाईक प्रवेश परिक्षेच्या आधारे आरक्षित जागेवर प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या अनुसूचित जाती, विजा- अ, भज, इमाव, विमाप्र, एसईबीसी या प्रवर्गातील विद्यार्थ्यांना जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे. त्यामुळे इयत्ता ११ वी व १२ वी विज्ञान शाखेत शिकत असलेल्या विद्यार्थ्यांच्या अर्जाची पडताळणी करण्याची कार्यवाही जिल्हा जाती प्रमाणपत्र पडताळणी समितीच्या स्तरावर सुरु आहे. त्या अनुषंगाने दि. १९ जानेवारी २०२६ ते २३ जानेवारी २०२६ या कालावधीत जात प्रमाणपत्र पडताळणीसाठी त्रुटी पुर्तता करणे विशेष मोहिम समिती कार्यालयामार्फत हाती



घेण्यात आली आहे. जात वैधता प्रमाणपत्र देण्याकरीता समितीस पुरेसा अवधी मिळवा तसेच जात वैधता प्रमाणपत्राअभावी मागासवर्गीय विद्यार्थी व्यावसायिक अभ्यासक्रमात प्रवेश मिळण्यापासून वंचिम राहू नये, यासाठी विद्यार्थी विहित वेळेत समितीकडे अर्ज सादर करणे आवश्यक आहे. तसेच ज्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांनी वैधता प्रमाणपत्र मिळण्याकरीता समितीकडे अर्ज सादर केलेले नाहीत. त्यांनी ज्या जिल्ह्यातील जातीचा दाखला प्राप्त केलेला आहे त्या जिल्ह्याच्या प्रमाणपत्र पडताळणी समितीकडे जात वैधता प्रमाणपत्र मिळण्याकरीता समितीकडे त्वरीत अर्ज सादर करावेत. ज्या विद्यार्थ्यांनी अद्याप प्रस्ताव सादर केलेला नाही, अशा विद्यार्थ्यांनी www.bartievalidity.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर ऑनलाईन पध्दतीने जात प्रमाणपत्र पडताळणीचे अर्ज सादर करावेत व त्याची एक प्रत जिल्हा जाती प्रमाणपत्र पडताळणी समितीकडे सादर करावी. ज्या विद्यार्थ्यांचे जात पडताळणीचे अर्ज समितीकडे प्रलंबित आहेत व ज्यांना समितीने ऑनलाईन त्रुटी कळविल्या आहेत. अशा अर्जदारांनी अर्जातील त्रुटीची पुर्तता करण्यासाठी समिती कार्यालयात दि. १९ जानेवारी २०२६ ते २३ जानेवारी २०२६ या कालावधीत प्रत्यक्ष संपर्क करुन या विशेष मोहीमेचा लाभ घेण्याचे आवाहन उपायुक्त तथा सदस्य जिल्हा जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती संगीता मकरंद यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे केले आहे.

## महानगरपालिका मतमोजणीसाठी वाहतूक मार्गात बदल

**आत्ताच एक्सप्रेस/जालना (प्रतिनिधी)**
महानगरपालिका निवडणूकाच्या अनुषंगाने जालना महानगर पालिकेची प्रभागनिहाय वार्डाची मतमोजणी दि. १६ जानेवारी २०२६ रोजी मे. सरस्वती ऑटो कम्पोनंटस प्रा. लि. प्लॉट नं. बी-८/१ जालना फेस - ३ एम. आय.डी. सी. इंडस्टीयल एरीया जालना येथे पार पडणार आहे. ही मतमोजणी सकाळी ७.०० वाजल्यापासुन फेरीनिहाय मतमोजणी संपेपर्यंत चालणार असून निकाल ऐकण्यासाठी जनतेची मोठ्या प्रमाणात गर्दी होऊन वाहतुकीची कोंडी निर्माण होऊ नये रस्ता मोकळा रहाव व रस्त्यावर वाहने उभी राहून मार्गात अडथळा निर्माण होऊन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये या दृष्टीने वाहतुकीच्या नियमनासाठी या मार्गावरील वाहतुकीस पर्यायी मार्गाने वळविण्यात आले आहे. असा आदेश पोलील अधीक्षक अजय बंसल यांनी पारीत केला आहे. दि. १६ जानेवारी २०२६ रोजी जालना महानगरी पालिकाची मतमोजणीचे अनुषंगाने वाहतुक नियमनाबाबत खालीलप्रमाणे बदल करण्यात आले आहे. नागपूर ते मुंबई समृध्दी महामार्गावरील जालना समृध्दी टोल नाका येथून बाहेर पडणारी आणि जालना तसेच छत्रपती संभाजीनगरकडे जाणारी वाहतुक ही मतमोजणी ठिकाणाच्या पुर्व बाजूकडील महादेव मंदीर - खांदगांव रोड- विनोद रॉय इंजिनियरिंग प्रा. लि. कंपनी- शिवनेरी हॉटेल- मार्गे जालना व छत्रपती संभाजीनगरकडे जाईल. छत्रपती संभाजीनगरकडून बदनापूर मार्गे येणारी व समृध्दी महामार्गाकडे जाणारी वाहतुक ही शिवनेरी हॉटेल- विनोद रॉय इंजिनियरिंग प्रा.लि.कंपनी-खांदगांव रोड - महादेव मंदीर मार्गे समृध्दी महामार्गाकडे जाईल.

## हिंद-की-चादर' : अंबड नगर परिषदेची बैठक संपन्न

**आत्ताच एक्सप्रेस**
**जालना (प्रतिनिधी)**
नांदेड येथे २४ व २५ जानेवारी रोजी होणाऱ्या 'हिंद-की-चादर' श्री गुरु तेग बहादूर साहिब जी यांच्या ३५० व्या शहीदी समागम वर्षानिमित्त अंबड नगर परिषदेत आज मुख्याधिकारी मनोज उकीरडे यांच्या अध्यक्षेत बैठक संपन्न झाली. यावेळी बैठकीत जिल्हाधिकारी यांनी 'हिंद की चादर' कार्यक्रमाच्या अनुषंगाने दिलेल्या सूचना आणि मार्गदर्शनानुसार चर्चा करुन नांदेड येथील कार्यक्रमासाठी अंबड शहरामार्फत तसेच प्रशासनामार्फत कोणत्या सेवा देता येईल याबाबतचे नियोजनासाठी चर्चा करण्यात आली.यावेळी बैठकीस नगर परिषद प्रशासनातील अधिकारी यांच्यासह विविध समाजातील प्रतिनीधी यांची उपस्थिती होती.

## मराठवाडा ग्रामीण विकास संस्थेचा 'क्रांतीनगर' येथे अभिनव उपक्रम

**आत्ताच एक्सप्रेस**
**जालना (प्रतिनिधी)**
मकरसंक्रांतीच्या शुभमुहूर्तावर जालन्यातील ऊसतोड कामगार, स्थलांतरित कुटुंबे, किशोरवयीन मुले आणि एकल महिलांसाठी 'खेळ व पोषण' हा अभिनव उपक्रम मोठ्या उत्साहात पार पडला. मराठवाडा ग्रामीण विकास संस्था (छत्रपती संभाजीनगर) यांच्या वतीने आयोजित या कार्यक्रमात खेळाच्या माध्यमातून आरोग्याचा संदेश देण्यात आला.

खेळातून आरोग्य शिक्षण

या उपक्रमाचे मुख्य वैशिष्ट्य म्हणजे केवळ व्याख्याने न देता खेळांच्या माध्यमातून माहिती देण्यात आली. यामध्ये प्रामुख्याने खालील बाबींवर भर देण्यात आला:पोषण थाळी जुळवा खेळ: शरीराला आवश्यक असलेल्या संतुलित आहाराची ओळख करून देण्यात आली.

प्रश्नोत्तरी व चित्रकला: चित्रांच्या माध्यमातून पोषक तत्त्वे आणि जंक फूडचे दुष्परिणाम समजावून सांगण्यात




आले.भूमिका नाट्य: दैनंदिन जीवनात सकस आहार कसा असावा, याचे प्रात्यक्षिक मुलांनी नाट्यातून सादर केले.

कार्यक्रमात केवळ पोषणावरच नव्हे, तर गावातील मूलभूत सुविधांवरही चर्चा करण्यात आली. गावातील पाणी पुरवठ्याचे योग्य नियोजन करून प्रत्येक कुटुंबाला पाणी मिळावे, यासाठी महिला आणि पुरुषांनी एकत्रितपणे प्रयत्न करण्याचे आवाहन यावेळी करण्यात आले.प्रकल्प व्यवस्थापक राहुल गाढवे यांच्यासह संदीप जाधव, विकास कांबळे आणि जिल्हा समन्वयक एकनाथ राऊत यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. लहान मुलांचे कुपोषण कसे रोखावे?

गर्भवती व स्तनदा मातांचा आहार कसा असावा?

किशोरवयीन मुला-मुलींच्या शारीरिक वाढीसाठी आवश्यक घटकांची माहिती दिली.

यावेळी सहभागी महिलांनी आपल्या दैनंदिन आहारात बदल करण्याचा आणि सकस अन्नाचा वापर करण्याचा संकल्प केला.खेळ आणि गाण्यांच्या माध्यमातून रंगलेल्या या उपक्रमात विजेत्या महिलांना बक्षीस देऊन गौरविण्यात आले. अशा उपक्रमांमुळे समाजात पोषणाबाबत जागृती निर्माण होऊन कुपोषण प्रतिबंधास मोठी मदत होईल, असा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला.यांची होती उपस्थिती: हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संस्थेचे कर्मचारी दुर्गा नाडे, शितल पराडे, आम्रपाली साळवे, मंगल झोडपे, आशा सेविका व स्वयंसेवकांनी विशेष परिश्रम घेतले. क्रांतीनगर येथे झालेल्या या कार्यक्रमाच्या उद्धाटन प्रसंगी राहुल गाढवे, एकनाथ राऊत, संदीप जाधव, विकास कांबळे आदी मान्यवर उपस्थित होते.

## शहर वाहतूक शाखा जालना यांचा अनोखा उपक्रम

**आत्ताच एक्सप्रेस**
**जालना/ प्रतिनिधी.गणेश सपकाळ** / मकर संक्रातीच्या सणानिमित्त पतंग उडवणे भारतीय संस्कृती आहे परंतु नायलॉन मांजाचा वापर करणे कायद्याने गुन्हा आहे,नायलॉन मांजपासून संरक्षण करण्याकरिता जालना शहर वाहतुकीतर्फे छत्रपती शिवाजी महाराज चौकामध्ये २०० मोटार सायकल चालकाला रुमाल वाटप करण्यात आले.यावेळी मा श्री अजय कुमार बंसल पोलीस अधीक्षक जालना,मा श्री आयुष नोपानी अप्पर पोलीस अधीक्षक जालना,श्रीमती जान्हवी शेखर आयपीएस,मा श्री अनंत कुलकर्णी उपविभागीय पोलीस अधिकारी तसेच इतर अधिकारी अंमलदार मोठ्या संख्येने उपस्थित होते.सदर उपक्रम यशस्वी होण्यासाठी पोलीस निरीक्षक प्रतापराव इंगळे शहर वाहतूक शाखा जालना व संजय सोनवणे



**मोटर सायकल व सायकल वरील नागरिकांना रुमाल वाटप करून नायलॉन मांजापासून संरक्षण बाबत दिला संदेश**

पोलीस अंमलदार स्थानिक गुन्हे शाखा यांनी परिश्रम घेतले.

## जि. प. शाळा बाचेगाव येथे 'मी ज्ञानी होणार' उपक्रमातील गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव

**आत्ताच एक्सप्रेस**
**जालना/ प्रतिनिधी.गणेश सपकाळ** / शिक्षण क्षेत्रातील नाविन्यपूर्ण 'मी ज्ञानी होणार' या राज्यस्तरीय उपक्रमांतर्गत घेण्यात आलेल्या परीक्षेत घवघवीत यश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांचा जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, बाचेगाव (ता. घनसावंगी, जि. जालना) येथे विशेष गुणगौरव करण्यात आला.

या प्रसंगी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष श्री. पांडुरंग मुळे यांच्या हस्ते यशस्वी विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे बक्षीस म्हणून वाटप करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या कष्टाचे कौतुक करताना त्यांनी भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

तसेच, शाळेतील प्राथमिक शिक्षक श्री. गिरे सर यांनी परीक्षेत १०० पैकी १०० गुण मिळवून प्रथम क्रमांक



पटकावल्याबद्दल समर्थ विष्णू मुळे या विद्यार्थ्याचे कौतुक करत त्यास १०१/- रुपये रोख बक्षीस देऊन विशेष सन्मान केला.

परीक्षेत उत्तम कामगिरी करणाऱ्या विद्यार्थी समर्थ विष्णू मुळे (६ वी) १०० गुण प्रथम क्रमांक, कल्याणी परमेश्वर वाजे (७ वी) ९८ गुणा द्वितीय क्रमांकए स्वराज घनश्याम मुळे (७ वी) ९६ गुणा तृतीय क्रमांक, ९० पेक्षा अधिक गुण मिळवणारे अन्य विद्यार्थी: रुद्र सुनील थोरात: ९४ गुण, वैष्णवी जनार्धन मिंधर: ९२ गुण, सोहम लक्ष्मण तारगे: ९२ गुण, रुद्र श्रीराम राऊत: ९२ गुण, भक्ती अरुण मुळे: ९२ गुण, श्रद्धा बालाजी मुळे: ९२ गुण, समर्थ नामदेव मुळे: ९२ गुण सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचे शाळेच्या वतीने अभिनंदन करण्यात आले. विद्यार्थ्यांचा उत्साह वाढवण्यासाठी पुढाकार घेऊन बक्षीस वितरण केल्याबद्दल शा.व्य.स. अध्यक्ष श्री. पांडुरंग मुळे यांचे शाळेच्या वतीने मनःपूर्वक आभार मानण्यात आले. या कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये आनंदाचे आणि उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

## सत्तेपुढे शहाणपण चालते, पण ते निर्भीडपणे मांडावेच लागते

### न्यायमूर्ती मोहिते-डेरे यांचा युवा विधीज्ञांना संदेश

**आत्ताच एक्सप्रेस**
**जालना/ प्रतिनिधी**/ सत्तेपुढे निर्भीडपणे सत्य मांडण्याचे धाडस वकिलांमध्ये असायला हवे. अन्यायाला आव्हान देत, ज्यांचा आवाज दाबला जातो त्यांच्यासाठी खंबीरपणे उभे राहणे हे प्रत्येक वकिलाचे कर्तव्य आहे, असे प्रतिपादन मुंबई उच्च न्यायालयाच्या न्यायमूर्ती रेवती मोहिते-डेरे यांनी केले. मेघालय उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायमूर्ती म्हणून पदभार स्वीकारण्यापूर्वी मुंबई उच्च न्यायालयात आयोजित निरोप समारंभात त्या बोलत होत्या. त्यांच्या या मार्गदर्शनाचे जालना येथील तरुण वकील आणि विधी शाखेच्या विद्यार्थ्यांसाठी विशेष महत्त्व असल्याचे मत नोटरी असोसिएशनचे कार्याध्यक्ष ड. महेश एस. धनावत यांनी व्यक्त केले आहे.

गुरुवारी (८ जानेवारी) मुंबई उच्च न्यायालयात आयोजित केलेल्या निरोप समारंभात बोलताना न्यायमूर्ती मोहिते-डेरे यांनी वकील आणि न्यायव्यवस्थेच्या जबाबदारीवर प्रकाश टाकला. केंद्र सरकारने १ जानेवारी रोजी न्यायमूर्ती डेरे यांची मेघालय उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायमूर्ती म्हणून नियुक्ती अधिसूचित केली होती. आपल्या भाषणात त्यांनी मुंबई उच्च न्यायालयाचा गौरवशाली वारसा जपण्याचे आवाहन केले. त्या म्हणाल्या, एक वकील म्हणून तुमची संविधानाप्रती मोठी जबाबदारी आहे. तुम्ही न्यायाचे आणि सत्याचे शिलेदार आहात. त्यामुळे निर्भयपणे बोला, अथकपणे युक्तिवाद करा आणि जे योग्य आहे त्याच्या बाजूने खंबीरपणे उभे रहा. तुमची सचोटी आणि धैर्य समाजात कायमस्वरूपी प्रभाव टाकेल. न्याय घडवण्याची शक्ती तुमच्या हातात आहे. केवळ अशिलांचे प्रतिनिधित्व करू नका, तर सामाजिक कारणांसाठी लढा. सत्तेपुढे सत्य बोला, अन्यायाला आव्हान द्या आणि ज्यांचा आवाज दाबला गेला आहे, त्यांच्यासाठी उभे रहा. तुमचा आवाज अत्याचार आणि स्वातंत्र्य यातील अंतर मिटवू शकतो.

यावर प्रतिक्रिया देताना नोटरी असोसिएशनचे कार्याध्यक्ष ड. महेश एस. धनावत म्हणाले की, न्यायमूर्ती मोहिते-डेरे यांचे शब्द हे केवळ मुंबईतील वकिलांसाठीच नव्हे, तर जालना सारख्या निमशहरी भागातील तरुण वकील आणि कायद्याचे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी दीपस्तंभासारखे आहेत. त्यांनी आपल्या भाषणातून कायद्याच्या व्यवसायाचे खरे सार सांगितले आहे. केवळ कायद्याची कलमे पाठ करून यशस्वी होता येत नाही, तर त्यासाठी सामाजिक बांधिलकी, सचोटी आणि अन्यायाविरुद्ध लढण्याची वृत्ती अंगी बाणवणे आवश्यक आहे. जालना जिल्ह्यातील युवा विधीज्ञांनी आणि विद्यार्थ्यांनी न्यायमूर्तींच्या मार्गदर्शनातून प्रेरणा घ्यावी. त्यांनी हे लक्षात ठेवले पाहिजे की, वकिली हे केवळ एक करिअर नसून, समाजातील शेवटच्या घटकाला न्याय मिळवून देण्याचे एक पवित्र कार्य आहे. न्यायमूर्ती मोहिते-डेरे यांनी सांगितल्याप्रमाणे, जेव्हा आपण निर्भीडपणे आणि निष्ठेने काम करतो, तेव्हाच आपण मुंबई उच्च न्यायालयाचा आणि पर्यायाने भारतीय न्यायव्यवस्थेचा गौरवशाली वारसा पुढे नेऊ शकतो.

न्यायमूर्ती मोहिते-डेरे यांनी आपल्या भाषणात पुढे सांगितले की, न्यायदान हे केवळ कायद्याचा अर्थ लावण्याचे काम नाही, तर लोकांचा न्यायव्यवस्थेवरील विश्वास दृढ करण्याची एक संधी आहे. पुणे येथे जन्मलेल्या न्यायमूर्ती मोहिते-डेरे यांनी सिम्बायोसिस लॉ कॉलेजमधून कायद्याची पदवी घेतली आणि केंब्रिज विद्यापीठातून एलएल.एम. पूर्ण केले. २१ जून २०१३ रोजी त्यांची मुंबई उच्च न्यायालयाच्या अतिरिक्त न्यायाधीश म्हणून नियुक्ती झाली आणि २ मार्च २०१६ रोजी त्या न्यायाधीश म्हणून कायम झाल्या. त्यांचा हा प्रवास आणि त्यांचे विचार निश्चितच नवोदित वकिलांसाठी प्रेरणादायी आहेत.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक सुग्रीव सोपानराव मुंढे यांनी निरंकारजी प्रिंट अँण्ड पब्लिकेशन, पी-३०/०/२,गुलमोहर कॉलनी,एन-५, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३१००३ (महाराष्ट्र), येथे छापून पी-३०/०/२, गुलमोहर कॉलनी, एन-५, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३१००३ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
मुख्यकार्यालय-०२४०-२४७४८१३, संपादक-सुग्रीव सोपानराव मुंढे मो.९४२१२८१०७८ , RNI.No.MAH/MAR2011/39247
The Printer, Owner Publisher **Sugriv Sopanrao Mundhe** Print at Nirankarji Print Publication, P-30/0/2, Gulmohar Colony, N-5 CIDCO, Chhatrapati Sambhajinagar -431003 (M.H.) Published at P-30/0/2, Gulmohar Colony, N-5 CIDCO, Chhatrapati Sambhajinagar -431003. (**Editor - Sugriv Sopanrao Mundhe**) Office Ph. : 0240-2474813